सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १९ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७७ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फक्त ३ हजारमध्ये वर्षभर टोलमुक्त प्रवास!

### आगामी १५ ऑगस्टपासून देशभरात राबवणार योजना

### गडकरींची घोषणा

नवी दिल्ली : केंद्रीय रस्तेवाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज, बुधवारी सोशल मीडियावरील एका पोस्टद्वारे ऋ-ढढरस बद्धलची घोषणा केली. वाहनचालकांसाठी लवकरच फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू होणार आहे. या नव्या योजनेंतर्गत वाहनधारकांना ३ हजार रुपयात वर्षभर (२०० ट्रीप) टोलमुक्त प्रवास करता येणार आहे. आगामी १५ ऑगस्ट २०२५ पासून ही योजना लागू होईल.

गडकरींनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केल्यानुसार आगामी १५ ऑगस्टपासून सुरू होणारी ही पास केवळ गैर-व्यावसायिक खासगी वाहनांसाठी उपलब्ध असेल. पास सक्रिय केल्याच्या तारखेपासून एक वर्षासाठी किंवा २०० फेऱ्या पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल) वैध राहील. वार्षिक पासमुळे देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवरून सहज आणि किफायतशीर प्रवास करता येईल, असे गडकरींनी म्हंटले आहे.

नवीन धोरण ६० किलोमीटरच्या परिघात असलेल्या टोलनाक्यांसंदर्भातील जुन्या समस्यांचे निराकरण करते आणि एकाच, परवडणाऱ्या व्यवहाराद्वारे टोल भरणे सुलभ करते. टोलनाक्यांवरील वेळ कमी करणे, वाहतूक कोंडीतून सुटका करणे आणि टोल प्लाझावरील वाद कमी करणे यासह लाखो खासगी वाहन मालकांना जलद आणि सुलभ प्रवासाचा अनुभव देणे, हा या वार्षिक पासचा उद्देश असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले. इच्छुकांना 'राजमार्ग यात्रा' या अधिकृत ॲपद्वारे हा पास ॲक्टिवेट करू शकतील.

## हिंदी भाषेला पर्याय आम्ही दिला, देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत पहिली पासून हिंदी भाषा शिकण्यास सक्ती नको. अशी भूमिका मांडली असताना राज्यात भाषावाद आता पाहायाला मिळतोय. महत्वाचं म्हणजे राज ठाकरेंच्या पत्रकार परिषदेवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली महत्वाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केलाय. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांमध्ये शैक्षणिक धोरणानुसार सर्व शाळांमध्ये पहिलीपासून तीन भाषा शिकणे अनिवार्य करण्यात आले होते. फडणवीस यांनी स्पष्टीकरण देताना म्हणाले. राज्य सरकारने हिंदी भाषा शिकण्यासाठी अनिवार्य केले होते. मात्र, आम्ही



हिंदी भाषेला पर्याय दिलेला आहे.

राज्य सरकारने हिंदी भाषेची अनिवार्यता काढून टाकण्यासाठी अधिसूचना जारी केली होती. त्यामुळे ज्यांना जी भाषा आवडते ती तीसरी भाषा शिकू शकतात. त्यामुळे तिसऱ्या भाषेची सूत्रता नव्या शैक्षणिक धोरणात समाविष्ट केली आहे. शैक्षणिक धोरणात मातृभाषेला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना दोन भाषा शिकाव्या लागतील मात्र, मुलं स्वभाविकपणे इंग्रजी भाषा स्विकारतील. मात्र तिसरी भाषा म्हणून कुठल्याही भारतीय भाषेचा पर्याया स्विकारता येईल. अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केली.

शिक्षकांची संख्या कमी असल्याने भाषा शिकवण्यासाठी उपस्थिती असलेल्या शिक्षकांवर अतिरिक्त काम करावं लागेलं अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडल्यानंतर, विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या भाषेच्या शिक्षक उपलब्ध केला जाईल, अशी भूमिका फडणवीस यांनी स्पष्ट केली. तसेच हिंदी भाषेचे शिक्षक सहज उपलब्ध होतात. २० विद्यार्थ्यांनी त्यांच्या पसंतीनुसार भाषा निवडली तर त्यांच्यासाठी शिक्षक उपलब्ध केला जाईल. त्यांना ऑनलाईन प्रशिक्षण दिलं जाईल. असे ही फडणवीस म्हणाले.

## सात ते आठ वाहने एकमेकांना धडकली, मुंबई पोलिसांच्या वाहनाचा समावेश...



अलिबाग : अलिबाग मुंबई पुणे दृतगती मार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात सात ते आठ वाहने एकमेकांना धडकली, महत्वाचे म्हणजे यात पोलसांचे एक वाहन होते. अपघातात सहा पोलीस आणि पाच बांगलादेशी नागरिक जखमी झाले आहेत. जखमी झालेल्यांना एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मुंबई - पुणे दृतगती मार्गावर भातान बोगद्यात पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर एक कंटेनर आडवा झाला होता. पोलिसांमार्फत कंटेनर काढण्याचे काम सुरु असताना पाठीमागून येणाऱ्या टेम्पोने कंटेनरला धडक दिली. टेम्पोच्या मागून अतिशय वेगात येणारी वाहने एकमेकांवर आदळली.यात मुंबई पोलिसांच्या वाहनाचा देखील समावेश आहे. पोलीस वाहनामध्ये घुसखोरी बांगलादेशी नागरिक होते. संबंधित बांगलादेशींना पोलीस घेऊन जात असताना, अपघातात बांगलादेशी जखमी झाले आहेत.

## माझा मतरदारसंघ राज्यात एक आयडियल म्हणून ओळख निर्माण करणार : आ. प्रशांत बंब

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शेतीसाठी बंद पाईपलाईनद्वारे मुबलक पाणी, गट शेतीच्या मध्यानातून एकच क्रोपिंग पॅटर्न, महिलांना बचत गटांना स्वयंरोजगार, दळणवळणासाठी रस्ते, गावागावात वाड्यावस्त्यावर सौर ऊर्जा अशा विविध पैलूंवर काम करत असून गंगापूर - खुलताबाद हा माझा मतदार संघ सर्वांच्या मदतीने राज्यात एक आयडियल म्हणून ओळख निर्माण करणार असल्याचा विश्वास आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केला.

खुलताबाद तालुक्यातील गोळेगाव येथील ग्राम पंचायती अंतर्गत विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण बुधवार (दि.१८) करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर



तहसिलदार स्वरूप कंकाळ, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, एल.जी. गायकवाड, प्रकाश वाकळे ज्ञानेश्वर नलावडे, प्रकाश चव्हाण, गणेश आधाने, दिनेश आंभोरे, सरपंच बबाबाई औटे, उपसरपंच संतोष जोशी यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना बंब म्हणाले की, गंगापूर तालुक्यातील लखमापूर ते सुलतानाबाद ३० हजार हेक्टर जमीन बंद पाईपलाईनद्वारे ओलिताखाली येणार आहे. आणि त्याच्याच दुसरा टप्प्यासाठी खुलताबाद तालुक्यातील ८० हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचा प्रस्ताव शासनदरबारी पाठवला आहे. काही काळात त्याला देखील मंजुरी आणून दुसऱ्या टप्प्याचे काम देखील आगामी काळात सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगून मतदारसंघातील जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि त्यांची गणित व इंग्रजी विषयांची भीती डोक्यातून घालवण्यासाठी मी मतदारसंघात स्वखर्चाने प्रत्येक शाळेत खाजगी शिक्षक पाठवून त्यांना अबॅकस या गणितीय पद्धतीचे धडे देत असून आता इंग्रजी देखील त्यांना सोप्या भाषेत शिकवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेतील एका एका शिक्षकाला फोनिक इन मराठी अर्थात इंग्रजी ही सांकेतिक भाषेत मराठीतून इंग्रजी शिकता येईल असे प्रशिक्षण त्यांना देत असल्याचे आमदार प्रशांत बंब म्हणाले.

दरम्यान प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्यांनी आप आपल्या मुख्यालयीच राहण्याचा पुनरुच्चार त्यांनी करून वारंवार विनंती, सूचना करून देखील कोणी ऐकत नसेल तर दुसरा पर्याय म्हणून ॲक्शन मोडवर येणार असल्याचे सूचना त्यांनी शिक्षक, तालाठी, ग्रामसेवक तसेच सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना दिल्या.

दरम्यान यावेळी शहराध्यक्ष परसराम बारगळ, योगेश बारगळ, योगेश काळे,सोमीनाथ जाधव, प्रशांत गदानकर, बाबासाहेब औटे, सचिन चव्हाण, हरिदास म्हसकर, नं, रावसाहेब देशमुख, अंकुश काळे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिलेटीन स्फोटातील गंभीर जखमी भारत पवार यांना शासनाने मदत करावी

### अक्षय भुंबे यांची मागणी

अंबाजोगाई : तालुक्यातील तळेगाव तांडा या ठिकाणी विहिरीचे खोदकाम सुरू होते. यावेळी विहिरीचे होल घेताना मोठा स्फोट झाला. या स्फोटात चौघे जण गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींपैकी एक जणाचा जागीच मृत्यू झाला. तर मजूर भारत तुकाराम पवार यांच्या शरीराच्या विविध भागांवर अणकुचीदार दगड उडून लागले. यामुळे त्यांचा एक डोळा कायमचा निकामी झाला आहे. तर शरीरातील रक्तवाहिन्यांना गंभीर इजा पोहोचली आहे. त्यामुळे जिलेटीन स्फोटातील मरण पावलेल्या व गंभीर जखमींना शासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष



अक्षय भुंबे यांनी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना मंगळवार, दिनांक १७ जुन रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे यांनी अंबाजोगाईचे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना या प्रकरणी निवेदन दिले आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना भुंबे यांनी सांगितले की, भारत तुकाराम पवार (रा.तळेगाव, ता.अंबाजोगाई) हे विहीरीचे खोदकाम करताना जिलेटीन स्फोट (ब्लास्ट) होऊन त्यांचा डोळा निकामी झाल्यामुळे कायमचे अपंगत्व आले असल्यामुळे सदरील काम करणाऱ्या गुत्तेदार यांच्याकडे जिलेटीन सारख्या स्फोटक भारी पदार्थ बाळगण्याचे व त्याचा व्यवसायासाठी वापर करण्याचा परवाना (लायसन्स) नसताना ते वापरल्यामुळे त्या गुत्तेदारांवर तात्काळ गुन्हा दाखल करून मजूर भारत तुकाराम पवार यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १८ मार्च २०२५ रोजी उत्तम पांडुरंग आडे (रा.तळेगाव तांडा, ता.अंबाजोगाई.) यांच्या विहीरीचे खोदकाम करीत असताना जुन्या होल मध्ये जिलेटीन असल्यामुळे नवे होल घेताना त्याचा स्फोट होऊन भारत तुकाराम पवार, धनराज अनंत दहीफळे, जीवन हरिश्चंद्र दहीफळे, तुकाराम विठ्ठल दहीफळे हे चौघेजण गंभीर जखमी झाले होते.

## ज्ञानेश्वर माऊलींसाठी भक्तिभावाने अर्पण - १ किलो सोन्याचा अलंकारिक मुकुट

आळंदी - भक्ती, कला आणि तंत्रज्ञान यांचा अद्वितीय संगम असलेल्या एका अलंकारिक मुकुटाचं आज आळंदीतील श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी अर्पण करण्यात आलं. नांदेड येथील श्री. भारत रामिनवार आणि सौ. मिरा रामिनवार या भक्तदांपत्यानं सुमारे १ कोटी रुपये किंमतीचा आणि १ किलो शुद्ध सोन्यापासून बनवलेला हा मुकुट ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी येथे अर्पण केला.

या मुकुटाची निर्मिती सुप्रसिद्ध पु. ना. गाडगीळ आणि सन्स लि. यांनी केली असून, चार महिन्यांच्या अथक परिश्रमातून तो साकारला आहे. पारंपरिक नक्षीकाम, धार्मिक प्रतीकांची सूक्ष्म कोरीव रचना आणि आधुनिक ३ऊ तंत्रज्ञानाचा



सुंदर समन्वय यामध्ये पाहायला मिळतो.

मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण आदी मंगल धार्मिक प्रतीकांची कलात्मक मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, वारकरी परंपरेशी नातं असलेल्या कुशल कारागिरांनी हा मुकुट भक्तिभावाने घडवला असून, त्यामुळे त्याला अधिक पावित्र्य लाभले आहे.

या विशेष प्रसंगी योगी निरंजननाथ (प्रमुख विश्वस्त), डॉ. भावार्थ देखणे (विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख), ज्ञानेश्वर वीर (व्यवस्थापक) आणि ड. राजेंद्र उमाप (विश्वस्त ) हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत माऊलींना हा अलंकार भक्तिपूर्वक अर्पण करण्यात आला.

हा मुकुट विशेष धार्मिक प्रसंगी माऊलींना परिधान करण्यात येणार असून, भाविकांसाठी तो श्रद्धा, भक्ती आणि अभिमानाचं प्रतीक ठरेल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं पारंपरिक श्रद्धेची अशी साजेशी मांडणी ही काळाशी सुसंगत अशी भक्तीची अभिव्यक्ती म्हणावी लागेल.

रामिनवार दांपत्याच्या या अद्वितीय अर्पणामुळे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सेवेत जोडलेली ही कलाकृती भाविकांच्या मनात अढळ स्थान मिळवेल, यात शंका नाही.

## भारत-पाकिस्तान यांच्यातील वर्ल्डकप

### सामनाचे वेळापत्रक जाहीर

मुंबई: २०२६मध्ये होणाऱ्या टी-२० महिला वर्ल्डकपचे यजमानपद इंग्लंड करत आहे. इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाने वर्ल्डकपचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार स्पर्धेचा पहिला सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात खेळवला जाईल. टी-२० वर्ल्डकपचे आयोजन १२ जून ते ५ जुलै पर्यंत असेल. भारतीय संघाचा पहिला सामना १४ जूनला पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. वर्ल्डकपमध्ये एकूण १२ संघ सहभाग घेतील. यातील ६-६ ग्रुप दोन संघात विभागला जाणार आहे. १२ संघांना ६-६ मध्ये विभागले जाईल. प्रत्येक ग्रुपमध्ये टॉप २ मध्ये असणाऱ्या संघांना सेमीफायनलमध्ये एंट्री मिळेल. भारत, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलियासह इतर २ क्वालिफाय करणाऱ्या संघांना ग्रुप ए मध्ये ठेवण्यात आले आहे.

## समाजात धर्म टिकवून धार्मिकता वाढवून समाजाला धर्मांतरणापासून रोखण्याचे काम अर्चक पुरोहित यांनी केले- गोविंदजी शेंडे

छत्रपती संभाजीनगर - भारतीय संस्कृतीमध्ये अर्चक पुरोहित यांचे स्थान खूप महत्त्वाचे आणि उच्च आहे. कोणताही लखपती करोडपती अब्जोपती असलेला व्यक्ती त्याच्या घरी नित्यकर्मासाठी पुरोहित आल्यास तो त्याच्या पायावर डोके नमस्कार करतो त्यावेळी तो पुरोहिताचे वय शिक्षण आर्थिक क्षमता काहीही पाहत नाही ही आपली संस्कृती आहे. ही संस्कृती यापुढेही चालू राहणार आहे पण यासाठी पुरोहित म्हणून मलाही माझं चारित्र्य माझं वागणं माझा पेहराव माझं बोलणं याकडे बारकाईने लक्ष द्यावे लागणार आहे असे गोविंद जी म्हणाले.

ते पुढे म्हणाले गुलामीच्या काळातही मुस्लिम धर्म स्वीकारा



किंवा मरा अशी परिस्थिती असताना हिंदू धर्मातील सोळा संस्कार श्री गणेशाची पूजा श्रीदेवीची पूजा दीपावली दसरा होळी जन्मापासून मृत्यूपर्यंत चे सर्व संस्कार आमच्या पुरोहितांनी जीवावर उदार होऊन केले तसेच समाजात धर्म टिकवून धार्मिकता वाढवून हिंदू समाजाला धर्मपरावर्तनापासून रोखले अशी माहिती विश्व हिंदू परिषद क्षेत्र मंत्री गोविंदजी शेंडे यांनी दिली ते विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम अखिल भारतीय पुरोहित महासंघ केशव माधव चतुर्वेद पाठशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आडगाव येथे संपन्न होत असलेल्या निवासी पुरोहित प्रशिक्षण शिबिरात उद्घाटन प्रसंगी बोलत होते यावेळी व्यासपीठावर विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष माननीय संजय आप्पा बारगजे आडगावचे सरपंच श्री गोरख निकम मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार केशव माधव चतुर्वेद पाठशाळेचे अध्यक्ष लक्ष्मण माने तसेच वेदशास्त्र संपन्न यज्ञेश्वर शास्त्री उपस्थित होते. यावेळी माननीय संजय आप्पा बारगजे सरपंच गोरख निकम श्री लक्ष्मण माने आर्य वेदमूर्ती यज्ञेश्वर शास्त्री यांनी आपले विचार व्यक्त केले. उद्घाटन समारंभाचे प्रस्ताविक राजीव जहागिरदार यांनी केले सूत्रसंचालन वर्गाचे पालक आनंदीदास रहाटीकर यांनी केले. उद्घाटन समारंभाला सर्व प्रशिक्षणार्थी तसेच अनिल चांदवडकर श्री ज्ञानेश्वर जाधव श्री शिवाजी दहिवाल श्री सतीश मुळे श्री विष्णुदास बेंबडे सह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विविध योजनांचा घेतला आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१८, :- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात विभागातील सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक यांच्याकडून विविध योजनांचा आढावा घेतला.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या या आढावा बैठकीला विभागातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध योजनेअंतर्गत सुरू असलेली घरकुलांची कामे १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करून संबंधितांना घरकुल वाटप



करण्यात यावे तसेच उर्वरित घरकुलांची कामे दिवाळीपूर्वी पूर्ण होतील, याबाबत नियोजन करावे. तसेच विभागातील योजना निहाय नियमितपणे आढावा घेत प्रत्येक योजनेच्या अंमलबजावणी बाबत सुक्ष्म नियोजन करुन प्रलंबित योजनांचा लाभ पात्र लाभार्थीपर्यंत पोहचावा. पेन्शन अदालत, आश्वासित प्रगती योजना, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या आदी आस्थापनाविषयक कामे गतीने मार्गी लावा, असे निर्देश त्यांनी दिले.

आपल्याकडे प्रलंबित असलेले विभागीय चौकशी अहवाल तत्परतेने निकाली काढून संबंधितांना देय असलेले लाभ देण्यात यावे. जिल्हा परिषद व पंचायत समिती तपासणी मुद्दे, अनुपालन अहवाल सादर करावा. स्थायित्वाचा लाभ ज्यांना देय आहे कोणतेही तांत्रिक कारण नाही अशा अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना स्थायीत्वाचा लाभ देण्यात यावा. पंचायत राज समितीकडील प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा तसेच महालेखाकार प्रलंबित परिच्छेद त्वरित निकाली काढा, अशा सूचनाही विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी दिल्या.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत स्वयंसहायता समुह स्थापना, ग्रामसंघ स्थापना, प्रभागसंघ स्थापना, स्वयंसहायता समुहांना फिरता निधी वाटप आर्थिक प्रगती, स्वयंसहायता समूहांना फिरता निधी वाटप, स्वयंसहायता समुहांना बँक कर्ज वाटप तसेच आर्थिक प्रगती व भौतीक प्रगती, उत्पादक गट स्थापना, लखपती दिदी योजनेबाबतही आढावा घेत योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यत विहित कालमर्यादेत पोहचावा, असेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मंजुर व पूर्ण घरकुले, सर्व राज्य पुरस्कृत आवास योजना (रमाई, शबरी, पारधी, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजनांचाही आढावा घेत पात्र लाभार्थीना घरकूल योजनांचा लाभ वेळेत देण्याबाबत नियोजन करा, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. जलजीवन मिशन सर्वकष योजना, लघु पाटबंधारे जिल्हा परिषद योजनांचा आढावा, जिल्हा वार्षीक योजना कोल्हापुरी बंधारे, कोल्हापुरी बंधाऱ्यांना गेट बसविणे दुरुस्ती व पाणी अडविण्याबाबतही योजनांबाबतही यावेळी माहिती देण्यात आली.

ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण, तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामांसाठी विशेष अनुदान, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम आढावा, स्थानिक विकास निधी कार्यक्रम आढावा, जि.प. स्तरावरील मंजूर कामे, शासन स्तरावरीत मंजूर कामांबाबतही आढावा घेण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना तसेच १५ वा वित्त आयोग राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना, ग्रामपंचायत कर वसुली, एक दिवस गावक-यांसोबत उपक्रम या उप्रकमासह शाळा खोली बांधकाम, आदर्श शाळा खोली बांधकाम, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत आर्थिक प्रगती आढावा, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत अपूर्ण कामाचा आढावा विभागीय आयुक्तांनी घेत याबाबत कामांना गती द्यावी, असेही ते म्हणाले.

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागा अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्दघटकांच्या वस्ती विकास करणे, आर्थिक भौतिक, मागासवर्गीय निधी खर्च, ग्रामपंचायत स्वसंपादीत उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणासाठी १५ टक्के निधी आढावा, स्थानिक स्वराज्य संस्था स्वसंपादीत उत्पन्नातुन दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधी तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, मॉडेल गावे स्थिती, वैयक्तिक शौचालय बांधकाम आणि अनुदान वितरणाची स्थिती, सार्वजनीक शौचालय बांधकाम प्रगती, प्लास्टीक वेस्ट मॅनेजमेंट, गोबरधन प्रकल्पाबाबत, गती शक्ती संचार पोर्टल प्रणाली महासंचार पोर्टलवरील प्रलंबित परवानगी अर्जाच्या निर्गतीबाबतचाही आढावा यावेळी घेण्यात आला. केंद व राज्य शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबतचे नियोजन करून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळाला पाहीजे, असे नियोजन करा, असे निर्देशही विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी दिले.

बैठकीस सर्व जिल्ह्यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तसेच अपर आयुक्त आस्थापना, सहाय्यक आयुक्त विकास व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## किल्लारी पाटीवर प्रवाशांची हेळसांड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
किल्लारी पाटी अतिक्रमणाच्या विळख्यात असून, एस.टी. बसही भर रस्त्यावर उभी करावी लागते. प्रवाशी शेडअभावी प्रवाशी महिला, पुरुष, शाळकरी मुलां-मुलींना बसची वाट पाहत भर रस्त्यावर तासन्तास उन्हात उभारावे लागत आहे. प्रवाशांची ही हेळसांड थांबवावी, अशी मागणी होत आहे.

किल्लारी हे औसा तालुक्यातील सर्वात मोठे गाव असून, किल्लारीच्या बाजारपेठेत खरेदी-विक्री करण्यासाठी परिसरातून बावन्न गावचे लोक ये - जा करतात. येथे ग्रामदैवत श्री नीळकंठेश्वरांचे मंदिर आहे, शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालय आहे. परंतु, येथे ये-जा करणाऱ्या प्रवाशांना लघु शंकेसाठी किंवा सावलीत थांबण्यासाठी कोणतीही सोय उपलब्ध नाही. गेल्या अनेक वर्षांपासून किल्लारी पाटी येथे भव्य असे प्रवाशी शेड उभे होते. परंतु, लामजना - उमरगा महामार्गाचे काम सुरू असताना ते पाडण्यात आले. महामार्गाचे काम पूर्ण होऊन तीन वर्षे उलटून गेली तरी अद्याप प्रवाशी शेड उभारण्यात आले नाही.

अनेकवेळा किल्लारीकरांनी लेखी निवेदने देऊन किल्लारी पाटीवर प्रवाशी शेड उभारण्याची मागणी होत असून, याकडे सबंधितांकडून दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे प्रवाशी व विद्यार्थ्यांत संतापाची लाट उसळली आहे. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्ये भर रस्त्यावर बसची वाट पाहत उभे राहण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन प्रवाशी व शाळकरी विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, किल्लारी पाटीवरून जाणाऱ्या सर्व एस. टी. बसेसला थांबा देण्यात यावा, अशी मागणी होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## गरजू मुलांना शैक्षणिक साहित्याची केली मदत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
तालुक्यातील बोरगाव काळे येथे राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंच, माटेफळ यांच्यावतीने अनाथ व गरजू अशा २० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यात शालेय बॅग, अर्धा डझन वह्या, अर्धा डझन रजिस्टर, पाच पेन, पेन्सिल, कंपासपेटी, पाणी बॉटल आदी शैक्षणिक साहित्यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच छाया बच्चेसाहेब देशमुख होत्या. यावेळी राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचचे संस्थापक अध्यक्ष बापू खोसे, अभियंता गोविंद हिंगे, अर्जुन कांबळे, बिभीषण घोडके, काशिनाथ खोसे, मोहन खोसे, विमल लकडे, रयतेचे स्वराज्य संघटनेचे राज्य संघटक ज्ञानेश्वर काळे, रमेश देशमुख, माजी आरोग्य विस्तार अधिकारी डॉ. सतीश देशमुख, भैरवनाथ झाडके, अण्णासाहेब शिंदे, राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष श्रीकांत पवार, ज्ञानेश्वर देशमुख, बच्चेसाहेब देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी सॉफ्टवेअर अभियंता तृप्ती सतीश देशमुख यांनी सामाजिक कार्यासाठी संस्थेला पाच हजार रुपयांची मदत केली. कार्यक्रमाचे नियोजन माजी चेअरमन दीपक काळे, नीळकंठ काळे यांनी केले होते. यावेळी उमेश देशमुख, करण साखरे, परमेश्वर काळे, दिलीप आदमाने, संदीपान फोलाने, दत्ता काळे, गोविंद आदमाने, शंकर ढोले यांच्यासह पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## ‘भेट पुस्तकरूपी मित्राची’; ‘रीड लातूर’चा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ‘रीड लातूर’ उपक्रम गेल्या तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आला. या उपक्रमांतर्गत



देण्यात आलेल्या पुस्तकांचे नियमीतपणे वाचन करत असताना विद्यार्थ्यांची पुस्तकांशी मैत्री झाली आहे. उन्हाळी सुट्ट्या संपल्यावर सोमवारी विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश केली तेव्हा ‘भेट पुस्तकरूपी मित्राची’ हा उपक्रम राबविण्यात आला. ज्या शाळांमध्ये पुस्तके देण्यात आली त्या शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुस्तके देवून पुस्तकांचे वाचन करून घेतले. पुस्तकरूपी आपल्या मित्राची भेट झाल्याने विद्यार्थी आनंदीत होते.

दीपशिखा धीरज देशमुख यांच्या संकल्पनेतून व धीरज देशमुख यांच्या पुढाकाराने लातूर ग्रामीण मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा उपक्रम सुरू आहे. आजपर्यंत जवळपास १२५ जिल्हा परिषद शाळांमध्ये हा उपक्रम नियमीतपणे सुरू असून अभ्यासाव्यतीरिक्तची मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील पुस्तके विद्यार्थी आनंदाने वाचन करत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सर्व शाळा सोमवारपासून सुरू झाल्या आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करून ‘भेट पुस्तकरूपी मित्राची’ हा उपक्रम राबविण्यात आला.

## विद्यार्थ्यांसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाजातील मांग, मातंग, मिनी मादीग, मादींगा, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधे मांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांसाठी २०२४-२५ शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी परीक्षेत ६० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना २०२५ मध्ये गुणानुक्रमे प्रथम ३ ते ५ विद्यार्थ्यांना निधी उपलब्धतेनुसार शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी २० जुलै २०२५ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, डाल्डा फॅक्टरी, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास ‘हुंडाई’ने दिली कार्डियाक रुग्णवाहिका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांमुळे हुंडाई मोटार फाऊंडेशनतर्फे ॲडव्हान्स सपोर्ट कार्डियाक रुग्णवाहिका तर आयडीबीआय बँकेच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ४२ सीटर बस भेट देण्यात आली आहे.

मंगळवारी याचा लोकार्पण सोहळा अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते व ‘आयडीबीआय’चे मुख्य झोनल अधिकारी श्रीकांत तिरपुडे व हुंडाई मोटारचे पुनीत आनंद यांच्या हस्ते पार पडला.

### आरोग्य शिबिरांचा प्रवास होणार सुलभ

अध्यक्षीय समारोपात अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते म्हणाले, विविध आरोग्य शिबिरे, क्षेत्रभेटी, अभ्यास दौरे आदी शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांसाठी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास बसची आवश्यकता होती. आमचा प्रस्ताव त्वरित मान्य करून ‘आयडीबीआय’ने बस उपलब्ध करून दिली आहे. यापुढेही ‘आयडीबीआय’कडून रुग्णहितासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी रुग्णहितासाठी सी.एस.आर. समितीशी संपर्क साधून वैद्यकीय महाविद्यालयास मदत करावे, असे आवाहन केले.

यावेळी विशेष अतिथी म्हणून ‘आयडीबीआय’चे नागपूर परिमंडळाचे उपविभागीय प्रमुख अखिलेश मिश्रा, सोलापूर विभागाचे अधिकारी एकनाथ जाधव, व्यवस्थापक अजिंक्य पवार, उपाधीष्ठाता डॉ. मंगेश सेलूकर, उपाधीष्ठाता डॉ. अजय ओव्हाळ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव, अतिविशेषोपचार रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर, समाजसेवा अधीक्षक संजय कांबळे, रमेश इंगळे, सिध्देश्वर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र सूर्यवंशी यांनी केले तर आभार बसवराज पाटील यांनी मानले.




## लातूर जिल्ह्यातील खेळाडूंना क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशाची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने राज्याच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत २०२५-२६ साठी पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, नाशिक, अकोला, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली येथील क्रीडा प्रबोधिनींमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे.

यामध्ये हॅण्डबॉल, जलतरण, सायकलिंग, फुटबॉल, ज्युदो आणि जिम्नॅस्टिक्स या खेळांसाठी निवासी आणि अनिवासी प्रवेश २६ ते २७ जून २०२५ दरम्यान ५० टक्के लेखी चाचणी आणि ५० टक्के कौशल्य चाचणीच्या आधारे दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर पदकप्राप्त किंवा राष्ट्रीयस्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व केलेले १९ वर्षांखालील खेळाडू तज्ज्ञ समितीसमोर चाचणी देऊन सरळ प्रवेशासाठी पात्र ठरतील. राज्यस्तरावर सहभागी १९ वर्षांखालील खेळाडूंना खेळनिहाय कौशल्य चाचणीत गुणानुक्रमे प्रवेश निश्चित होईल. ७ जुलै २००६ नंतर जन्मलेले आणि ८ जुलै पर्यंत १९ वर्षे पूर्ण झालेले खेळाडू प्रवेशास पात्र आहेत. क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशासाठी इच्छुक खेळाडूंनी २४ जून पर्यंत मूळ क्रीडा प्रमाणपत्रासह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे कार्यालयीन वेळेत नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## ५० रुपयांची उधारी मागितली; पानटपरी चालकाचा खून

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
सुपारीची ५० रुपयांची उधारी मागितली असता, त्याचा राग मनात धरून कोयत्याने वार करून पानटपरीचालकाचा खून केल्याची घटना सोमवारी रात्री बाभळगाव रोडवरील म्हाडा कॉलनीत घडली. यावेळी झालेल्या हाणामारीत अन्य तिघेजण जखमी झाले असून, यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. जखमींवर उपचार सुरू असून, याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात मंगळवारी सकाळी दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, लातूर शहरातील बाभळगाव रोडवरील म्हाडा कॉलनी परिसरात एक पानटपरी आहे. टपरीचालकाची याच परिसरात राहणाऱ्या एका युवकाकडे सुपारीची ५० रुपये उधारी होती. सोमवारी दुपारी पानटपरी चालकाने ही उधारी मागितली असता, या दोघांमध्ये बाचाबाची झाली. दरम्यान, याचा राग मनात धरून आरोपींनी सोमवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास म्हाडा कॉलनी परिसरातच तू सुपारीची उधारी का मागितलास, असे म्हणत टपरीचालक गणेश उत्तम सूर्यवंशी (वय ३८, रा. म्हाडा कॉलनी, लातूर) याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करीत त्याच्यावर कोयत्याने वार केले. यात गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. यावेळी झालेल्या मारहाणीत देविदास किसन गायकवाड (वय ५०), करण राजू काळुंके (वय २०) आणि राजू दास काळुंके (वय ४५, सर्व रा. म्हाडा कॉलनी, लातूर) हे दोघेजण जखमी झाले आहेत. जखमींवर विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी शहजाद शेख आणि अब्बास शेख (दोघेही रा. म्हाडा कॉलनी, लातूर) यांच्याविरोधात विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक अनिल कांबळे हे करत आहेत.

### मारहाणीच्या घटनांत वाढ

गेल्या काही दिवसांपासून लातूर शहरासह जिल्हाभरात चोरी, हाणामारी, चेनस्नॅचिंग यासारख्या घटनांत वाढ झाली आहे. गेल्या महिनाभरात शहरासह जिल्ह्यात खुनाच्या पाच घटना घडल्या आहेत. मंगळवारी (दि.१६) रात्री केवळ ५० रुपयांच्या उधारीवरून टपरीचालकाचा खून करण्यात आला. शहरात विशेषत: शहराच्या पूर्व भागात हाणामारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी रात्री घटनास्थळी शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व विवेकानंद चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली.

## राजमाता जिजाऊंचे विचार आत्मसात करावेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
राजमाता माँ जिजाऊंनी बाल शिवबांवर सुसंस्कार केले. त्यामुळे शिवाजी महाराजांनी स्वराज्यासह सुराज्याची स्थापना केली. आजच्या मातांनीही आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत. राजमाता जिजाऊ यांचे प्रेरणादायी विचार आत्मसात करावेत, असे आवाहन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी मंगळवारी केले.



येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, संगमेश्वर विद्यालय व राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजमध्ये स्मृतिदिनानिमित्त राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, आर. पी. मुंडे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते आदी उपस्थित होते.

यानिमित्त राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यावेळी प्राचार्य केंद्रे यांनी माँ जिजाऊ यांच्या जीवन-कार्यावर प्रकाश टाकून त्यांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

## शहरात मान्सुनपूर्व मोठे - छोटे नाल्यांच्या सफाईचे काम पुर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
लातूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मान्सुन पुर्व नालेसफाई करणे आवश्यक असल्याने शहरात मोठे एकूण ६८ नाले व छोटे ८४ असे एकूण १५२ नाले सफाई करणेसाठी लातूर शहर महानगरपालिका मार्फत ४ मोठे जे.सी.बी, ४ छोटे जे.सी.बी, १ पोकलेन व ८ हायवा यंत्रणेमार्फत दि.०१.०५.२०२५ पासून मान्सुन पुर्व नाले सफाईची मोहिम हाती घेण्यात आली होती एकूण ५१३५ मे.टन गाळ उचलण्यात आलेला आहे. तरी लहान व मोठे नाल्यांचे सफाईचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच प्रभाग निहाय अंतर्गत नाल्या मनपा सफाई कर्मचा-या मार्फत ३०.०६.२०२५ पर्यंत सफाई करण्यात येत आहे.

सदर मान्सूनपुर्व नाले सफाईच्या कामाच्या नियंत्रणासाठी ४ मुख्य स्वच्छता निरीक्षक, १८ स्वच्छता निरीक्षक व छोट्या नाल्या साफ सफाई साठी ३५० स्वच्छता कर्मचारी कार्यरत आहेत.

तसेच पावसाळ्यामध्ये आपत्काली परिस्थीतत कामे करण्यासाठी लातूर शहर महानगरपालिका येथे आपत्कालीन कक्षाची स्थापना करण्यात आली असून सदर कक्ष दैनंदिन २४ तास कार्यरत असून आपत्कालीन कक्षात दैनंदिन कामासाठी १ स्वच्छता निरीक्षक, २ मुकादम व १४ स्वच्छता कर्मचाऱ्यासह अनेक जण हे काम करीत आहेत.

## आमदार कराडांच्या जन्मदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
तालुक्यातील खरोळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळा, इंदिरा माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्रशाला येथे सोमवारी उत्साहाच्या वातावरणात भाजपचे युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार तथा भाजप नेते रमेश कराड यांच्या जन्मदिनानिमित्त मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांच्यावतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभंगे, रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया, विस्ताराधिकारी लहाने, भाजपचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका एम. एम. सुरनर, इंदिरा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस. व्ही. कारभारी, जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक जी. एम. गुरमे, सरपंच धनंजय देशमुख, उपसरपंच बाबनसाब शेख, हनुमंत राऊतराव, सोमनाथ फुलारी, राजू मानमोडे, राजू कांबळे, सचिन आडतराव, प्रल्हाद फुलारी, गोविंद धबडगे, खलील ताशेवाले, रमेश बाबर, प्रताप राऊतराव, बब्बूअण्णा आडतराव, मंचक राऊतराव, नितीन राऊतराव, जगन्नाथ खळे, सुरेश जाधव, राहुल कांबळे यांच्यासह त्या-त्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ऋषिकेश कराड म्हणाले, शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यात शाळेबद्दल आपुलकी, जिव्हाळा, प्रेम निर्माण व्हावा, अभ्यासाबरोबरच खेळाला महत्त्व देऊन सामाजिक ज्ञान देणे गरजेचे आहे. देशाचे उद्याचे भविष्य घडविण्याचे महान कार्य शिक्षकांच्या हातून होत असते. प्रत्येकाच्या यशात शिक्षकांच्या मेहनतीचा मोठा वाटा असून, त्यांच्याबद्दल प्रत्येकाच्या मनात मानसन्मान असायला हवा, असे ते म्हणाले.

खरोळा येथील तिन्ही शाळेत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात विद्यार्थी स्वागताचा कार्यक्रम पार पडला. तिन्ही शाळेतील संबंधितांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पालिका आयुक्त मीना यांच्या हस्ते टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ जून -**
प्रधानमंत्री टीबीमुक्त अभियान अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर महापालिका यांच्या समन्वयाने महापालिका आयुक्त मानसी मीना यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप करण्यात आले.

विजय पस्तापुरे, प्रसाद उदगीरकर, श्याम धूत, रामेश्वर सोमाणी, दीपक वारद, राजू मिनियार, नरेंद्र भुतडा, संजीव भार्गव, रतन बिदादा यांच्या सहकार्यातून हे किट देण्यात आले.

यावेळी आयुक्त मानसी मीना यांनी, शहरात राबविण्यात येणारा फूड बास्केट देण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे गौरवोद्गार काढले.



महापालिकेच्या आरोग्य विभागाने या कामी राखलेल्या समन्वयाबद्दल कौतुक करतानाच टीबी रुग्णांना वर्षभरासाठीचे न्यूट्रिशनल सपोर्ट किट पुरवठा करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाच्यावतीने औषधींचा मोफत पुरवठा करण्यात येतो. रुग्ण पूर्णपणे बरा होण्यासाठी औषधासोबतच पोषण आहार आवश्यक असतो. त्याच्या पूर्ततेसाठी लोकसहभागातून न्यूट्रिशनल सपोर्ट किट देऊन निक्षय मित्र होता येते. निक्षय मित्र होण्याची प्रेरणा घेऊन डॉ. अशोक पोद्दार यांनी आपल्या मित्रमंडळींना याकामी योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. प्रास्ताविक महापालिकेतील आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केले. डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि क्षयरोग विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पैठण शहराचा विकासासाठी निधी देणार : माधुरीताई मिसाळ

तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ : माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे ,आमदार विलास बापू भुमरे,नगराध्यक्ष सुरज लोळगे यांचा प्रमुख उपस्थित मंत्रालय मुंबई ईथे नगरविकास राज्यमंत्री मंत्री माधुरी ताई मिसाळ यांचा दालना मध्ये पैठण शहरातील विविध समस्येबाबत व निधी मागणी संदर्भात बैठक संपन्न झाली.पैठण शहराच्या विकासासाठी आपण निधी देणार असल्याची माहिती यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी दिली.

शहरातील स्वच्छता समस्या,अपूर्ण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, अपूर्ण मलनिस्सारण योजना, व शहरासाठी विविध विकास कामासाठी निधी चा मागणी संदर्भात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावर खालील प्रमाणे मंत्रीमहोदयानी या



बैठकीमध्ये आश्वासित केले..पैठण नगरपरिषदेला स्वच्छतेसाठी तूर्त २ कोटी रुपये उपलब्ध करून देऊ व पाहिजे तेवढा निधी उपलब्ध करून देऊ या साठी विहित मार्गांनी निधी मागणीचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावा असे आश्वासित केले. शहराला स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ५ कोटी रुपये पुरस्कार अनुदान मंजूर झाले होते या पैकी २.५ कोटी रुपये प्राप्त झाले होते व २.५ कोटी रुपये अप्राप्त होते. या निधी मागणी चा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात यावा शासनाकडून सादर निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

प्रधान मंत्री आवास योजना अंतर्गत पहिल्या टप्प्यातील जे ७१० व ४०७ घरकुल मंजूर केले आहे त्या घरकुलांना लवकरच निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासित केले. शहरातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे शहरात नवीन डी.पी. मागणीचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर कराव, या साठी निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासित केले. शहरात पाणीपुरवठा योजना सुरू आहे ती संथ गतिनी सुरू असल्यामुळे त्या योजनेला गती देणे बाबत आदेशित केले. शहरात प्राधिकरणातून पाणी पुरवठा जलकुंभ त्या करण्यात आलेले आहे येणाऱ्या एक महिन्यात करण्यांवीत् करण्यात यावे असे आदेश केले. शहरातील अनेक विविध विकास कामासंदर्भात निधीची मागणी करण्यात आली अशा अनेक कामांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात याव सदर प्रस्तावास शासनस्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासित केले.

यावेळी,उपनगराधक्ष महेशजी जोशी, सुनील रासने,लक्ष्मण औटे विजय ठाणगे, सतिष आहेर, विजय चाटूपळे, सिध्दार्थ परदेशी, कैलास बरकसे, विशाल पोहेकर,बंडू आंधळे, सुनील रासने, सुनील विर, रशीद कुरेशी, समिर शुक्ल आदी पदाधिकारी उपस्थित होते.यासाठी पैठणकरांच्या वतीने आमदार विलास बाप्पू भुमरे, नगराध्यक्ष सुरज लोळगे यांचे अभिनंदन केले जात आहे.

## भरतशेठजी गोगावले रोहयो व फलोत्पादन मंत्री यांनी बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिर येथे केला अभिषेक



खुलताबाद प्रतिनिधी : भरत शेठ गोगावले रोहयो व फलो उत्पादन मंत्री महाराष्ट्र राज्य व छत्रपती संभाजी नगर मध्ये चे आमदार प्रदीप जैस्वाल वेरूळ येथे आले असता खुलताबाद पंचायत समितीच्या वतीन स्वागत करण्यात आले. प्रकाश नाईक खुलताबाद पंचायत समिती चे गटविकास अधिकारी. अभिजीत गायकवाड एम आर ई जी एस सहाय्यक कार्यक्रम अधिकारी. दीपक बागुल विस्तार अधिकारी. शिवाजी मते .भरत शेळके.भीमाशंकर लांडगे. दिनेश सपकाळ आदी कर्मचारी उपस्थिती होते.

## आयएनए सोलरसाठी आणखी एक मोठे पाऊल

मुंबई – एस.सी. एक्झॅक्ट इक्विपमेंट कंपनी लिमिटेडचे अधिग्रहण करून आयएनए सोलरने हा टप्पा गाठण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ३ गिगावॅट टर्नकी सोलर सेल मॅन्युफॅक्चरिंग लाइनसाठी एलओआयवर स्वाक्षरी केली आहे. ज्यामुळे देशातील सौर सेल निर्मितीला एक नवीन दिशा मिळेल. आयएनए सोलरचे अध्यक्ष श्री. मनीष गुप्ता आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. विकास जैन यांनी माहिती दिली की, कंपनीची स्थापना २०१७ मध्ये केवळ ८० मेगावॅटच्या पीव्ही मॉड्यूल उत्पादन क्षमतेसह झाली. जुलै २०२५ पर्यंत, कंपनी ४ गिगावॅट मॉड्यूल उत्पादनाचा प्रभावी टप्पा गाठेल. एवढेच नाही तर, कंपनीने २०२७ पर्यंत ८ गिगावॅट पीव्ही मॉड्यूल्स, ३ गिगावॅट सोलर सेल्स आणि ५४,००० एमटीए अ‍ॅल्युमिनियम फ्रेम उत्पादन क्षमतेचे लक्ष्य ठेवले आहे. सतत प्रगती आणि गुणवत्तेप्रती वचनबद्धतेसह, आयएनए सोलरने आज भारतातील टॉप १० सोलर पॅनेल उत्पादकांमध्ये स्वतःला स्थापित केले आहे.

## श्रेया संजय पांडे हिला ९९.९९ पर्सेंटाइल

मुंबई – फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने आपल्या एमएचटी सीईटी २०२५ च्या निकालांची घोषणा केली असून महाराष्ट्र बोर्डच्या ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पीसीएम विभागात ९८ पेक्षा जास्त पर्सेंटाइल गुण मिळाले आहेत. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रेया संजय पांडे (९९.९९ पर्सेंटाइल), निर्भय दिलीप लाहोडे (९९.८१ पर्सेंटाइल) आणि सुकल्प राऊत (९९.६१ पर्सेंटाइल) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी पीडब्ल्यूचे यूट्यूब चॅनल पीडब्ल्यू महाराष्ट्रचा वापर करून तयारी केली होती. त्यातून संकल्पनेवर आधारित शिक्षण तसेच वन शॉट व्हिडिओसारख्या स्वरूपातून उजळणी करून घेतली जाते.मला संकल्पनेच्या स्पष्टतेबाबत तडजोड करायची नव्हती, असे मत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक असलेल्या श्रेयाने व्यक्त केले. त्याचमुळे मी पीडब्ल्यूचा पर्याय निवडला. मला लेक्चर्सची उजळणी करता यायची, शंका तात्काळ सोडवता यायच्या आणि माझ्या अभ्यासाचे वेळापत्रक शालेय तासांभोवती तयार करता यायचे. त्यामुळे मला सर्वांत कठीण विषयांचा सामनाही सहजपणे करता आला.

## डेटॉल फ्रेश 'नेहमीच तयार' रहाण्यासाठी देते प्रोत्साहन

छत्रपति संभाजीनगर : भारतातील सर्वात विश्वासार्ह स्वच्छता ब्रँडपैकी एक असलेल्या डेटॉलने त्यांच्या प्रसिद्ध कोलोन फ्रेश आणि लाइम फ्रेश साबण प्रकारांमध्ये १२ तासांचा ताजेपणा* देऊन वैयक्तिक काळजी घेण्याची वचनबद्धता वाढवली आहे. ही ऑफर वाढत्या ग्राहकांच्या गरजा – म्हणजेच तुम्ही सुरक्षित आहात आणि दिवसभर ताजेतवाने वाटत आहात हे समजल्यावर येणारा आत्मविश्वास तुम्हाला देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. लांब प्रवासादरम्यान, कामावर किंवा जास्त वेळ सामाजिक संवादापूर्वी कधीही अनपेक्षितपणे शरीराची दुर्गंधी येऊ शकते – ज्यामुळे लोकांना अस्वस्थ वाटू शकते, संकोच किंवा अगदी लाज वाटू शकते. डेटॉल फ्रेश ९९.९% दुर्गंधी निर्माण करणारे जंतू काढून टाकून आणि तुम्हाला १२ तास* ताजेपणा देते तसेच ही दररोजची अस्वस्थता दूर करते, जेणेकरून लोकं आत्मविश्वासाने आणि कोणत्याही संधीचा फायदा घेण्यास तयार असतील.

## टी.आय.एम.ई. तर्फे क्लॅट २०२६/२७ साठी 'ऑल इंडिया फ्री सीपीएसएटी' ' ची घोषणा – २२ जून रोजी आयोजन

मुंबई ,१७ जून २०२५ : टी.आय.एम.ई. . संस्थेने संपूर्ण भारतभरातील क्लॅट इच्छुक विद्यार्थ्यांसाठी ' ऑल इंडिया फ्री सीपीएसएटी ' ची घोषणा केली आहे. हा मोफत शिष्यवृत्ती आणि प्रवेश चाचणी परीक्षेचा उद्देश क्लॅट २०२६/२७ या शैक्षणिक वर्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणे आहे. परीक्षेची तारीख: रविवार, २२ जून २०२५ वेळ: दोन स्लॉट्समध्ये परीक्षा घेतली जाईल – सकाळी १०:०० वाजता आणि संध्याकाळी ४:०० वाजता. विद्यार्थ्यांनी फक्त एकच स्लॉट निवडून नोंदणी करावी. ही परीक्षा ऑनलाइन घेतली जाईल. एकूण ६० बहुपर्यायी प्रश्न असतील आणि परीक्षेसाठी एक तासाचा कालावधी असेल. ६० मिनिटांनंतर परीक्षा स्वतःहून सबमिट होईल. परीक्षेचा अभ्यासक्रम क्लॅट च्या पाठ्यक्रमावर आधारित असेल आणि प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.२५ गुणांची निगेटिव्ह मार्किंग केली जाईल. सध्या इयत्ता ११वी किंवा १२वीमध्ये शिकणारे विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र आहेत. या मोफत शिष्यवृत्ती चाचणीद्वारे सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीनुसार १००% पर्यंत कोर्स फीवर सवलत मिळू शकते. ही सवलत ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्ही क्लॅट २०२५/२६ कोर्सेससाठी लागू असेल.

## आईकू नेआईकू ज़ेड10 लाइट ५जी लाँच केले

नवी दिल्ली : उच्च–कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आईकू ने आज त्यांची नवीनतम ऑफर आईकू ज़ेड१० लाइट ५जी लाँच केली. हा स्मार्टफोन विशेषतः आजच्या तरुणांना लक्षात घेऊन डिझाइन केला आहे – महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते परवडणाऱ्या ५ जी स्मार्टफोनवर अपग्रेड करू इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत. हे उपकरण बिनगे–वॉचिंग, सोशल स्क्रोलिंग आणि ऑनलाइन व्याख्याने यासारख्या क्रियाकलापांसाठी पूर्णपणे भरलेला मनोरंजन अनुभव देते. स्टायलिश डिझाइनमधील कार्यात्मक वैशिष्ट्यांसह, ज़ेड१० लाइट ५जी एक स्मार्ट आणि विश्वासार्ह साथीदार आहे.या सेगमेंटमधील सर्वात मोठ्या ६०००एमएएच बॅटरीसह येणारे हे उपकरण अविरत मनोरंजनासाठी सज्ज आहे. हे मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० ५जी प्रोसेसरद्वारे समर्थित आहे, जे स्मूथ ५जी कनेक्टिव्हिटी आणि आयपी६४ डस्ट वॉटर रेझिस्टन्ससह उत्तम कामगिरी देते.

## वंदना पाठक पुनरागमन करत आहेत झी टीव्हीवर

अशा समाजात जिथे नाती आणि लग्न अनेकदा वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरांच्या आधारे ठरवले जातात, आणि जिथे वय, आर्थिक स्थिती आणि सामाजिक पार्श्वभूमी अशा घटकांना खूप महत्त्व दिले जाते – तिथे प्रेम मात्र कोणतेही नियम मानत नाही. ते स्वतःचा मार्ग स्वतः ठरवतं आणि वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना पार करतं. अनेक दशकांपासून अशा प्रगतीशील आणि भावनिकदृष्ट्या प्रभावी कथानकांसाठी झी टीव्ही वाहिनी ओळखली जाते. ही वाहिनी आता एक नवीन आणि भावस्पर्शी कल्पनारम्य मालिका – 'तुम से तुम तक' प्रेक्षकांसमोर घेऊन येत आहे. ही अपारंपरिक प्रेमकथा दोन अतिशय भिन्न व्यक्तिमत्त्वांमधील असामान्य नात्याभोवती फिरते – अनु, एक १९ वर्षांची उत्साही आणि साधी पार्श्वभूमी असलेली तरुणी आणि आर्यवर्धन, एक ४६ वर्षांचा शिस्तप्रिय, स्वतःच्या मेहनतीवर उभा राहिलेला उद्योगपती.

## पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या ११ वर्षांची यशस्वी वाटचाल

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. १८ में पैठण तालुक्यातील बिडकीन मंडळ येथे दि. १६ मे रोजी मंगल कार्यालय येथे भाजपाची सेवा, सुशासन व गरीब कल्याण बद्दल ची माहिती जणते पर्यंत पोहचावी यासाठी कार्यशाळेचे आयोजन भारतीय जनता पार्टी बिडकीन मंडळाच्या वतीने करण्यात आले.या कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय अर्थ मंत्री तथा खासदार तथा संकल्प से सिद्धी चे महाराष्ट्राचे संयोजक मा.भागवत कराड, यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या उद्दिष्टांची चर्चा करत उपस्थित सर्व पदाधिकारी ,कार्यकर्ते यांच्याशी संवाद



साधण्यात आला.

या कार्यक्रमा प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, जिल्हा संयोजक संकल्प से सिद्धीचे प्रमुख सुरेश बनकर ,अल्पसंख्यांकचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, महिला जिल्हाध्यक्ष पुष्पताई काळे, माजी.तालुकाध्यक्ष तुषार शिसोदे ,जिल्हाध्यक्ष भाजपा शिक्षक आघाडीचे रंगनाथ लघाने सर , विहामांडवा मंडळ अध्यक्ष दत्ता वाकडे, आडूळ मंडल अध्यक्ष रामेश्वर तांबे, दत्ता आम्ले आदी मान्यवरांची उपस्थिती होती, कार्यक्रमाचे आयोजक बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांनी मान्यवरांचा सत्कार करून प्रास्ताविक केले, या कार्यक्रमा प्रसंगी गणेश काळे,विठ्ठल मोगल, ग्रामपंचायत सदस्य अविनाश राठोड, चंद्रकांत हुड,संतोष तोतला, किशोर धर्मे, भागचंद कोथिंबीरे,भागवत ठाकूर, कैलास जाधव, सुनील गडदे,अभिजीत ढाकेफळे, परमेश्वर नजन,नितीन गिधाने, दिगंबर सर्जे,गणेश दाने दिनेश तोतला,संतोष एरंडे, नासेर पठाण, अर्जुन भवर, ,निकेश राऊत, निलेश धडे,वकील शिंदे, रेखा ठाणगे, सुरेखा ठाणगे,आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन रंगनाथ लघाने सर यांनी केले, कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली

## २१ जून रोजी जिल्हा आयुष रुग्णालयात योगसत्राचे आयोजन

अहिल्यानगर दि.१८– जिल्हा रुग्णालय व जिल्हा आयुष रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा आयुष रुग्णालय,अहिल्यानगर येथे योगसत्राचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय घोगरे यांनी दिली आहे. स्वास्थ्य रक्षणासाठी योग आचरणात आणणे आवश्यक आहे.योग व प्राणायामाच्या सहाय्याने विविध प्रकारच्या आजारांवर नियंत्रण मिळवता येते . नागरिकांनी योगवर्ग व योगोपचार शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले आहे. तसेच दि. २३ ते २७ जून २०२५ दरम्यान सायंकाळी ४ ते ५ यावेळेत जिल्हा आयुष रुग्णालय ,अहिल्यानगर येथे योग प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे . योगविद्याधाम संस्थेचे योगतज्ञ योगासने आणि प्राणायामाचे प्रशिक्षण देणार आहेत.

## खोट्या गुन्ह्यात अडकलेल्या फार्मासिस्टला मिळाला न्याय

### चार्जशीटमध्ये तपास अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा- न्यायालयाची टिपणी

तभा वृत्तसेवा

कन्नड:दि.१४ जून – शहरातील नोंदणीकृत वैद्यकीय फार्मासिस्ट रुपेश भारुका यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली तक्रार तसेच आरोपपत्र उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि . १२ जुन गुरुवार रोजी निकाल देत रद्द केली आहे. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, भारुका यांच्यावर लादलेले आरोप हे तथ्यहीन, कायद्याच्या चौकटीबाहेरचे असून तपास अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा या प्रकरणामागे कारणीभूत ठरवून त्यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून न्यायालयाने त्यांच्यावरील कारवाई रद्द केली आहे.

कोरोना महामारीच्या काळात कन्नड येथील नोंदणीकृत फार्मासिस्ट असलेल्या रुपेश भारुका यांच्यावर नशेसाठी औषध विकल्याचा आरोप करण्यात आला होता दि . २४ एप्रिल २०२० रोजी औषध निरीक्षक आर.एम.बजाज यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिटी चौक पोलीस ठाणे छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर भारुका यांना अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात येऊन त्यांची जामिनावर सुटका झाली होती. या प्रकरणात अवैध औषध विक्री, अपायकारक पदार्थ वापरून इजा करणे, अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ तसेच औषधीद्रव्य अंतर्गत गुन्हांचा समावेश होता. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक प्रवीण पाथरकर यांनी केला होता.

भारुका यांनी स्वतः वरील गुन्हा आणि आरोपपत्र रद्द करण्यासाठी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यांच्यातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड.सुमित अग्रवाल यांनी कोर्टात काम पाहिले. याचिकेच्या सुनावणीदरम्यान, संबंधित गुन्ह्यात पोलिसांनी आरोपपत्र दाखल केल्यामुळे तेही रद्द करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती.संपूर्ण प्रकरणाच्या सुनावणीअंती, न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती रोहित जोशी यांच्या खंडपीठाने हा निकाल देताना तपास प्रक्रियेतील निष्काळजीपणावर तीव्र टिप्पणी केली.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे मनोज पवार भाजपात



कन्नड :दि.१८ जून – शहरातील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते मनोज केशवराव पवार यांनी आपल्या समर्थकांसह मंगळवारी (दि.१७) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाला रामराम ठोकत मुंबई येथील भाजपा कार्यालयात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे, मंत्री गिरीष महाजन, भाजपा नेते रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते तर भाजपा संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, आमदार संजय केणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कन्नड तालुक्यात भारतीय जनता पक्ष मजबूत करण्याचे आवाहन केले.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये नविन शैक्षणिक वर्ष २०२५ उत्साहात साजरा



बिडकीन दि १८ में : बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये नविन शैक्षणिक वर्ष उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे ऑक्शन करुन फुलांचा वर्षाव करुन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेच्या प्रवेशद्वारा समोर रांगोळी काढून रंगबिरंगी फुगे लावण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील शिक्षक शिक्षिका यांचा शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांनी नवनविन उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन केले व शाळेच्या पहिल्या दिवसाच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## हुनर हाली गांधी झळकणार कैकयीच्या भूमिकेत

सोनी सब वाहिनीवरील 'वीर हनुमान' मालिका हनुमानाच्या कमी ज्ञात असलेल्या गोष्टी सादर करून प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. यात काम करणाऱ्या मोठमोठ्या कलाकारांच्या संचातील एक ठळक नाव आहे ते हुनर हाली गांधी या अभिनेत्रीचे. हुनर या मालिकेत कैकयीची भूमिका करत आहे.


## टी. सी. हरवली आहे

कौस्तुभ चंद्रकांत भिंगारे रा. जैतापूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर या शालेय विद्यार्थ्यांची दि.१३/०६/२०२५ रोजी टाकळी ते जैतापूर प्रवासात कॉलेज बॅग हरवली असून या बॅग मध्ये इयत्ता १२ वीची टी.सी, गुणपत्रक वगैरे महत्वाची कागदपत्रे आहेत. सदरील कॉलेज बॅग कोणास आढळल्यास खालील पत्यावर संपर्क करावा ही विनंती.

**संपर्कासाठी पत्ता : कौस्तुभ चंद्रकांत भिंगारे**

मु.पो. जैतापूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर मो नं.९८२३९८४९९८

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क ३७७/२०२५

अर्जदार :– १) लक्ष्मीबाई विलास खवले, वय. ८९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. टेंभापूरी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) बेबीताई शिवाजी कंठाळे, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. नक्षत्रवाडी ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, ठकुबाई जनार्धन ढोले हे टेंभापूरी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. १४/०३/२०२५ रोजी टेंभापूरी ता. गंगापुर येथे मयत झाल्या तसेच त्यांचे पती हे दि. २०/५/१९८० रोजी मौजे टेंभापूरी ता. गंगापूर येथे मयत झाले असून मयतांना अर्जदार क. १ व २ ही विवाहीत मुली आहे. मयत ठकुबाई जनार्धन ढोले यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय व इतर कार्यालयात अर्जदार हे मयत ठकुबाई जनार्धन ढोले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नांदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद,**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. १०४/२०२५

अर्जदार: १. लिलाबाई शिवाजी करणकाळ, वय ७५ वर्षे, भंदा रा. पोहरी खु., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, घरकाम, २. रविंद्र शिवाजी उर्फ शिवाजीभाई करणकाळ (पाटील), यय–५७ वर्षे, धंदा शेती, रा. जिवनभाई की चाळ कालीवाड बोर्डी फलीया जी.एल.डी.सी. वापी पार्टी वलसाड गुजरात. ह.मु. पोहरी बु., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. आबा शिवाजी करणकाळ, वय–५७ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. आर.ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शिवाजी दौलत करणकाळ हे दि. ०२/०५/२०२१ रोजी पोहरी बु., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत शिवाजी दौलत करणकाळ यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २३/०७/२०२५.

आज दि. १८/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सौयगांव

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८९/२०२५.

१. मंगलाबाई पांडुरंग जाधव, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोहरी बु. ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. ज्ञानेश्वर पांडुरंग जाधव, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. रेखाबाई वाल्मीक पाटील, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोराडखेडा, ता. पाचोरा, जि. जळगांव. ४. मिनाबाई गोपीचंद आमले, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडाळे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. ५. सुमन गजानन पाटील, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोहरी बु. ता. सोयगांव. जि. छ. संभाजीनगर. ६. सरलाबाई बापु पाटील, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोथली, ता. भडगांव, जि. जळगांव.

विरुद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे वावत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पांडुरंग पुंडलीक जाधव यांचा दिनांक १४/०५/२०२४ रोजी पोहरी बु. येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ६ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयत पांडुरंग पुंडलीक जाधव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २४/०७/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सौयगांव

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९०/२०२५.

१. संगीताबाई गोपीनाथ मोरे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. सागर गोपीनाथ मोरे, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.३. स्वप्निल गोपीनाथ मोरे, वय २० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गोपीनाथ वाळुबा मोरे यांचा दिनांक २७/०३/२०२५ रोजी आमखेडा. येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत गोपीनाथ वाळुबा मोरे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २५/०७/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सौयगांव

## अग्रलेख...

# आनंदाची वारी : ज्ञानबा तुकाराम..!

'वारी' या शब्दाचा अर्थ नियमित फेरी, व्रत, येरझारा असा आहे. तर 'वारकरी' म्हणजे पंढरीची वारी करणारा, ठरलेल्या दिवशी यात्रा करणारा असा आहे. हे वारकरी आपसात जो आचारधर्म पाळतात तो 'वारकरी धर्म'. साधारणपणे जून, जुलै म्हणजेच ज्येष्ठ आषाढात शतकानुशतके नाचत, गात, चालत असलेली ही वारी आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरला विठू माउलीच्या दारी बरोब्बर पोहोचते. ज्ञानेश्वर, नामदेवांच्या काळात म्हणजे तेराव्या शतकात सर्व जातींची संतमंडळी पंढरपूरला नेहमीच एकत्र येत असत. 'वारकरी' हा जातिविरहित संप्रदाय मानला जातो.

'सकळांशी आहे येथे अधिकार' या उक्तीप्रमाणे ज्ञानदेव, नामदेव, चोखामेळा, सावता माळी, नरहरी सोनार, मुक्ताबाई, बहिणाबाई, एकनाथ, सेना न्हावी इत्यादींपासून तुकारामांपर्यंत सर्व या संत मांदियाळीत येतात. आदिनाथांपासून निवृत्तिनाथांपर्यंत 'एक गुरू व एक शिष्य' अशी नाथ परंपरा चालत आली. पण संत ज्ञानेश्वरांनी ही परंपरा खंडित करून ते ज्ञान सर्वांना खुले करून दिले. त्यातूनच सर्वांनाच मार्गदर्शक ठरणाऱ्या 'ज्ञानेश्वरी'ची निर्मिती झाली. यंदा १८ जूनला संत तुकारामांची पालखी देहू येथून आणि १९ जूनला संत ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून निघणार आहे. ज्येष्ठ कृष्ण ७ व ८ या दोन तिथींमध्ये कधीही बदल झाला नाही, होत नाही आणि होणार नाही.

**पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ॥**
**व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशी मुखी नाम ॥**
**नाम विठोबाचे घेईन मी वाचे । बीज कल्पांतीचे तुका म्हणे ॥** असे संत तुकाराम म्हणतात. पंढरपूर म्हणजे अवघ्या तीर्थांचे माहेर. पंढरपूरची वारी केली की इतर कुठलीही तीर्थयात्रा करण्याची आवश्यकता राहत नाही. या अभंगात ते अतिशय गौरवाने सांगतात, 'माझ्या घराण्यात पंढरपूरच्या वारीची परंपरा अखंड सुरू आहे. त्यामुळे इतर कुठल्याही तीर्थाचे व्रत मी करीत नाही. पंढरीची वारी करताना एकादशीच्या उपवासाचे व्रत मात्र मी अगत्याने पाळतो. वारीची वाटचाल करताना आणि पंढरपूरच्या भूमीत गेल्यावर मुखी अहर्निश विठुरायाचा नामघोष सुरू असतो. विठुरायाचे नाम कल्पांतीचे बीज आहे, अवघ्या अस्तित्वाचे कारण आहे.' वारी ही पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकरी संप्रदायाची एक महत्त्वाची आणि प्राचीन परंपरा आहे. तेराव्या शतकात या परंपरेचे उल्लेख सापडतात. संत ज्ञानदेव आणि संत तुकारामांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती. वारी ही ज्ञानदेवपूर्वकालीन प्रथा असून, 'वारकरी' हे नाव वारीमुळेच पडले आहे. वारी हा एक आनंद सोहळा असून, यात अनेक जातींचे, उच्चशिक्षित-निरक्षर, श्रीमंत-गरिब सर्वजण एकोप्याने प्रवास करतात. वारीला कोणताही आयोजक किंवा प्रायोजक नसतो आणि त्यासाठी जाहिरातही केली जात नाही. ज्यामुळे तिचे नैसर्गिक आणि स्वयंभू स्वरूप दिसून येते. वारीची परंपरा शेकडो वर्षांची असून ती मानवी संस्कृतीचा एक स्थायीभाव आहे. पंढरपूर वारी हा परंपरा, परिपाठ आणि परिपूर्ण व्यवस्थापनाचा संगम आहे. ती केवळ एक धार्मिक पदयात्रा नाही, तर ती महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ही परंपरा ८०० वर्षांहून अधिक प्राचीन असून तिचे मूळ संत ज्ञानेश्वरांच्याही पूर्वीचे आहे. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे स्वतः वारी करत असल्याचा उल्लेख आढळतो, यावरून या परंपरेच्या ऐतिहासिकतेची साक्ष मिळते. वारी म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे सजीव रूप. समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारलेला हा संप्रदाय संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांमधून तात्त्विक अधिष्ठानासह समाजापर्यंत पोचवला. संत तुकाराम महाराजांनी आपल्या 'अभंगवाणी'तून भक्तिमार्ग अधिक सुलभ व लोकाभिमुख केला.

पालखीची आधुनिक संकल्पना संत तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण बाबा यांनी १६८५ मध्ये सुरू केली. या उपक्रमामुळे वारीला संघटित, शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले. वारीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची सर्वसमावेशकता. जात, पंथ, लिंग किंवा सामाजिक स्तर यांचे बंधन येथे मानले जात नाही. सर्वजण एकमेकांना 'माउली' म्हणून संबोधतात आणि परस्पर सन्मानाने एकमेकांच्या पाया पडतात. ही केवळ एक पदयात्रा नाही, तर ती हिंदुत्वाच्या मूल्यांवर आधारित एक सामाजिक क्रांती आहे.

दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरमध्ये १० ते १५ लाख भाविक एकत्र येतात. ही संख्या सातत्याने वाढत आहे. कोविड-१९ महामारीनंतर वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ दिसून आली आहे. वारीचे आकर्षण आता केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. कर्नाटक, आंध्र यासारख्या शेजारील राज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक येतात. वारीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यवस्थापकीय पैलूंचा अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी नागरिक, संशोधक आणि अभ्यासकही या सोहळ्यात सहभागी होतात. वारीचे हे वाढते जागतिक आकर्षण केवळ तिच्या धार्मिक महत्त्वामुळेच नाही, तर तिच्या अद्वितीय व्यवस्थापन प्रणालीमुळे आहे. कोणत्याही एका केंद्रीय संस्थेच्या नियंत्रणाशिवाय, स्वयंशिस्त आणि परस्पर सहकार्यावर चालणारा लाखो लोकांचा हा सोहळा व्यवस्थापनशास्त्राच्या अभ्यासकांसाठी एक आदर्श 'केस स्टडी' बनला आहे. याच पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र सरकारने या अनोख्या परंपरेला 'जागतिक वारसा' दर्जा मिळावा यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

वारीच्या यशस्वी व्यवस्थापनाचा मूलाधार 'दिंडी' या संकल्पनेत आहे. दिंडी म्हणजे वारीच्या प्रवासात शिस्तबद्ध पद्धतीने चालणारा वारकऱ्यांचा एक संघटित गट. ही रचना वारीला एक विकेंद्रित पण अत्यंत प्रभावी व्यवस्थापन प्रणाली बांधली जाते. वारीला सध्याचे संघटित स्वरूप देण्याचे श्रेय १९ व्या शतकातील सरदार हैबतबाबा आरफळकर यांना दिले जाते. त्यांनीच दिंड्यांना क्रमांक देऊन आणि पालखीसोबत घोडे समाविष्ट करून वारीला लष्करी शिस्तीसारखे स्वरूप दिले. दिंडी म्हणजे साधारणपणे एकाच गावातील किंवा गुरुपरंपरेतील वारकऱ्यांचा समूह. प्रत्येक नोंदणीकृत दिंडीला एक विशिष्ट क्रमांक दिला जातो आणि पालखीच्या रथापुढे किंवा मागे चालण्याचे त्यांचे स्थान ठरलेले असते. हा क्रम संपूर्ण वारीदरम्यान काटेकोरपणे पाळला जातो, ज्यामुळे लाखो लोकांच्या गर्दीतही एक सुसूत्रता आणि शिस्त टिकून राहते. यंदा वारीत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात २८० आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात ३७७ दिंड्या आहेत. वारीतील शिस्त ही स्वयं-प्रेरित आणि परंपरेवर आधारित आहे. वारकरी एकमेकांना 'माउली' म्हणून संबोधत असल्यामुळे आपोआपच जात, लिंग, वय आणि सामाजिक दर्जा यावर आधारित भेद गळून पडतात, समतेची भावना दृढ होते. संपूर्ण दिंडीत एकाच वेळी एकच अभंग एकाच तालात म्हटला जातो. एकीची आणि शिस्तीची भावना निर्माण होते. वारीचा सुमारे २१ दिवसांचा पायी प्रवास अक्षरशः एका 'चालत्या-फिरत्या शहरा'च्या व्यवस्थापनासारखा आहे. मार्गावरील 'यजमान' गावे वारकऱ्यांचे स्वागत आणि आदरातिथ्य करणे ही आपली सामाजिक जबाबदारी समजतात. या 'सेवा' परंपरेमुळेच लाखो वारकऱ्यांच्या निवास आणि भोजनाची सोय शक्य होते. अनेक गावकरी आपली घरे, वाडे वारकऱ्यांसाठी खुली करून त्यांची राहण्याची सोय करतात. अलिकडेच, राज्य सरकारने वारकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि वारीच्या व्यवस्थापनात सुसूत्रता आणण्यासाठी ५० कोटी रुपयांच्या प्रारंभिक निधीसह 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन केले आहे. या महामंडळामार्फत वारकऱ्यांसाठी पेन्शन, विमा आणि तीर्थक्षेत्र विकासकामे केली जाणार आहेत. शेवटी महत्त्वाचे हेच आहे,

**संत कृपा झाली । इमारत फळा आली ॥**
**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥**
**नामा तयाचा किंकर । तेणे रचिलें तें आवार ॥**
**जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥**

## विशेष

### प्रा. सुखदेव बखळे

# 'मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम'ला चालना

भारतात पायाभूत क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला आहे. त्यातही गतिमान वाहतूक आणि एकात्मिक वाहतूक सेवांवर भर दिला जात आहे. जगात आता 'मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम्स' (एमआरटीएस)चा अंगीकार सुरू आहे. या बाबतीत भारताचे स्थान तिसरे आहे. 'एमआरटीएस' मध्ये मेट्रो रेल, रॅपिड रेल, मोनोरेल, निओ रेल आदींचा समावेश होतो. सध्या या सेवा एक हजार किलोमीटर क्षेत्रात आहेत. जगात या सेवांच्या विस्तारात भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. हाँगकाँग आणि जपान त्याबाबत आघाडीवर आहेत. २०३२ पर्यंत ही सेवा सुमारे तीन हजार किलोमीटरपर्यंत विस्तारेल, अशी अपेक्षा आहे. त्यानंतर भारत जगातील अशा सेवेबाबत दुसऱ्या क्रमांकाचा देश होईल. तथापि या प्रकल्पांची आर्थिक शाश्वतता हे एक आव्हान आहे. आर्थिक शाश्वतता साध्य करण्यासाठी, धोरण आणि नियोजन स्तरावर 'ट्रांझिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट'(टीओडी) बाबत मानसिकता बदलणे आवश्यक आहे. हाँगकाँग आणि जपान ही जगातील 'ट्रांझिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट' अंतर्गत शहरी वाहतूक प्रकल्पांची सर्वोत्तम उदाहरणे आहेत. तेथील अधिकारी त्यांच्या प्रकल्प संकल्पनेच्या टप्प्यातच 'टीओडी' समाविष्ट करतात. त्याशिवाय प्रकल्पांना मान्यताही मिळत नाही. ते पहिल्या दिवसापासून प्रकल्प आणि ऑपरेशनल व्यवहार्यता सुनिश्चित करतात. भारतात 'टीओडी'चा विचार नंतर केला जातो. बहुतेक प्रकरणांमध्ये प्रकल्प मंजूर झाल्यानंतर बांधकाम आणि ऑपरेशनल टप्प्यामधील एक सहायक महसूल स्रोत म्हणून त्याकडे पाहिले जाते.

सर्वोत्तम जागतिक यंत्रणांचा अवलंब करणे वाढीव बदलांद्वारे साध्य करता येत नाही. वाहतूक प्रकल्पाच्या एकूण संकल्पनेबाबत मानसिकतेमध्ये बदल आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मेट्रो रेल्वेसारख्या शहरी वाहतूक प्रकल्पासाठी रिअल इस्टेट आणि व्यावसायिक महसुलात सहायक सेवांमधून उभा राहणारा महसूल मोठ्या प्रमाणात विभागला जातो. तिथे व्यावसायिकांमध्ये जाहिरात अधिकार, अन्न आणि पेय हक्क, दूरसंचार अधिकार इत्यादींचा समावेश असतो. ट्रांझिट लाईनचे काही भाग कार्यान्वित होताच जाहिरातींसाठी निविदा प्रकाशित केल्या जातात आणि विक्रेते गुंतवले जातात. तथापि, ट्रांझिट नेटवर्क वाढत असताना असे केले जाणे असमर्थनीय आहे. लहान मेट्रो रेल्वे करार असलेले अनेक परवानेधारक सर्व समान ब्रॅण्ड आणि मीडिया खरेदीदारांना आकर्षित करत आहेत. त्यामुळे ते एक कमॉडिटी बनत आहेत. यातून किमती कमी होऊन महसूल कमी होतो. ट्रांझिट अधिकाऱ्यांनी अशा करारांना एकाच प्लॅटफॉर्मअंतर्गत एकत्रित आणण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना जाहिरातींचे दर राखण्यास आणि एकूण जाहिरातींचे प्रमाण वाढवण्यास मदत होते. किरकोळ विक्री आणि अन्न आणि पेय हक्क, दूरसंचार हक्क, रिअल



इस्टेट मुद्रीकरण इत्यादींसाठीही हेच मुद्दे लागू होतात. देशाच्या प्रगतीसाठी पायाभूत सुविधा महत्त्वपूर्ण आहेत. आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता येत असल्याने केंद्र सरकार देशातील पायाभूत सुविधा नियोजन आणि विकासाला गती देण्यासाठी पीएम गतिशक्ती प्लॅटफॉर्मसाठी 'एआय'च्या प्रगत आवृत्तीचा वापर करू शकते. गेल्या दोन वर्षांमध्ये देशात सुमारे २०० प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. त्याचे मूल्य सुमारे १३.५ लाख कोटी रुपये आहे.

भारतीय विमान वाहतूक उद्योग जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. वाढती हवाई वाहतूक, ग्राहकांची वाढती मागणी आणि पायाभूत सुविधा वाढवण्याच्या उद्देशाने सरकारी पातळीवर बऱ्याच सुधारणा होत आहेत. या क्षेत्रात केवळ पर्यटन आणि प्रवासाला चालना देण्याचीच नव्हे, तर रोजगाराच्या हजारो संधी निर्माण करण्याची आणि आर्थिक विकासाला चालना देण्याची क्षमता आहे. उद्योगाला नवीन आव्हाने आणि संधींचा सामना करावा लागत असल्याने भारतातील विमान वाहतुकीच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी उद्योगप्रमुख, भागधारक, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांना एकत्र आणणे महत्त्वाचे आहे. भारताचे पायाभूत सुविधा क्षेत्र परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. खाजगी भागधारकांना पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी जोखीम-लाभ वाटणी अधिक संतुलित करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, पायाभूत सुविधा बांधण्यासाठी सरकारला बहुपक्षीय एजन्सींकडून कर्ज घेणे सुरू ठेवावे लागेल. त्यामुळे कर्जाची मर्यादा संपून जाईल. मेट्रो रेल्वेसारख्या शहरी वाहतूक प्रकल्पांमध्ये प्रवासी संख्येचे प्रमाण प्रकल्प संकल्पनेच्या वेळी आणि सविस्तर प्रकल्प अहवालाच्या वेळी केलेल्या अंदाजांपेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पाच्या डिझाईन, नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये प्रवासी संख्येचे उपक्रम एकत्रित करण्याची खरी गरज आहे. प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी केला जातो, तेव्हाच खाजगी वाहतुकीतून सार्वजनिक वाहतुकीकडे ट्रांझिट मॉडेल स्थलांतर होऊ शकते.

बहुतेक ट्रांझिट अधिकाऱ्यांनी 'मल्टिमोडल इंटिग्रेशन आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'ची योजना आखली आहे; परंतु त्याचे परिणाम कमी झाले आहेत. सर्वांत प्रभावी उपक्रमांमध्ये 'ट्रांझिट स्टेशन्स'साठी फीडर बसमार्ग, स्टेशनच्या प्रवेशद्वारांवर/निर्गमनांवर ऑटो रिक्षा स्टॅण्ड सर्व वाहतूक डिझाईनमध्ये एकत्रित केले आहे; जेणेकरून प्रवाशांना गंतव्यस्थळी सहज पोहोचता येईल. ई-बाईक आणि ई-स्कूटरसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचा विचार करण्यात आला आहे; परंतु त्याच्या अंमलबजावणीचे प्रमाण मर्यादित आहे. ते वाढवण्यावर भर द्यावा लागेल. अधिक पारंपरिक सार्वजनिक वाहतूक पद्धतींसह अखंड एकीकरण महत्त्वाचे आहे. इतर उपक्रमांमध्ये डिजिटल टिकिटिंगचाही समावेश आहे. तिथे व्हॉट्स अॅप, यूपीआय अॅप्स, वॉलेट अॅप्स इत्यादींद्वारे तिकिटे खरेदी करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. त्यामुळे तिकिटांच्या रांगा टाळता येतात. त्यामुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो. यात एक 'लॉयल्टी प्रोग्राम' विकसित करण्याचे प्रयत्नदेखील केले जाऊ शकतात. त्याद्वारे प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना प्रत्येक किलोमीटर प्रवासासाठी कार्बन क्रेडिट मिळेल. परिणामी, कार्बन उत्सर्जन टळेल. ते भविष्यातील प्रवास आणि वाहतूक परिसंस्थेत सहभागी होणाऱ्या किरकोळ, अन्न आणि पेय ब्रॅण्डसाठी रिडीम केले जाऊ शकते. या पैलूंसाठी धोरणात्मक उपाययोजना सक्षम करणे आवश्यक आहे. तसे केल्यासच एकात्मिक शहर आणि वाहतूक नियोजन भारतातील शहरी वाहतूक पायाभूत सुविधांच्या पुढील दशकाला आकार देईल.

'मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड' (एमएमओपीएल) ही 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर', 'व्हेओलिया ट्रान्सपोर्ट' आणि 'एमएमआरडीए' यांच्या मालकीची संयुक्त उद्यम कंपनी आहे. मुंबई मेट्रोच्या लाईन एक प्रकल्पाच्या (वर्सोवा-घाटकोपर) अंमलबजावणीसाठी ही कंपनी स्थापन करण्यात आली होती. हा मार्ग ११.४ किलोमीटर लांबीचा आहे. भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईतील सर्वांत प्रतिष्ठित प्रकल्पासाठी 'एमएमओपीएल'ने 'डेल्टा'च्या लॅम्प आधारित व्हिडीओ वॉल सोल्यूशनमध्ये गुंतवणूक केली. 'डेल्टा'ने अनेक विभाग हाताळण्यास सक्षम कंट्रोलर आणि क्यूब कंट्रोल सॉफ्टवेअर सादर केले. 'एमएमओपीएल' लाईन १ पूर्व ते पश्चिम कनेक्टिव्हिटी प्रदान करते. नजीकच्या काळात ही मेट्रो दररोज सुमारे सहा लाख प्रवाशांना सेवा देईल. या लाईनमध्ये एक प्रगत सिग्नलिंग सिस्टिम आहे. त्यात 'ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन सिस्टिम' (एटीपीएस) आणि ट्रेन हालचाली नियंत्रित करण्यासाठी ऑटोमॅटिक सिग्नलिंग समाविष्ट आहे. सिग्नलिंग, सीसीटीव्ही मॉनिटरिंग, पॉवर मॉनिटरिंग आणि रिले पॉईंट मॉनिटरिंग हे सर्व 'डेल्टा'च्या व्हिडीओ वॉलवर प्रदर्शित केले आहेत. मेट्रो ट्रेन्स फक्त १८.५ तास चालणार असल्या तरी डेल्टा व्हिडीओ वॉलवर ऑपरेशन्सचे संपूर्ण काळ निरीक्षण केले जाईल. अन्य विभागातही अशाच सेवा सुरू कराव्या लागतील.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

### गिरीश शेरेकर

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन

ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू हा आंदोलनातून स्वत:ची ओळख निर्माण करणारा नेता आहे. प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून समाजातल्या विविध घटकांतील वंचित, शोषित, पीडितांकडे शासनाचे आणि प्रशासनाचे कायम लक्ष वेधणारा हा नेता रुग्णसेवक म्हणून ओळखला जातो. अनेक वेगवेगळी अभिनव आंदोलने बच्चू कडू यांनी केली आहे. चारवेळा आमदार राहिलेल्या बच्चू कडू यांचे परिचय पत्र (बायोडाटा) लांबलचक आहे. आमदारकीच्या पहिल्या तीन खेपेमध्ये सत्ताधाऱ्यांपासून दूर राहून त्यांना कोंडीत पकडणाऱ्या बच्चू कडू यांना आमदारकीच्या चौथ्या खेपेत सत्तेत सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळात ते राज्यमंत्री होते. जवळपास अडीच वर्ष ते मंत्री होते. सत्तेचा अनुभव चांगला होता की नाही, हे त्यांनी जाहीरपणे कधी सांगितले नाही. पण, एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभागी होऊन ते गुवाहाटीला गेल्याने अनेकांना त्यांच्या सत्तेतल्या अनुभवाचे अंदाज बांधणे शक्य झाले. पुढे शिंदेंच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळात थेट सहभाग हा त्यांचा हक्क होता. पण, माशी कुठे शिंकली माहिती नाही. दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान अध्यक्ष असे राज्यमंत्री दर्जा असलेले पद त्यांना देण्यात आले. दिव्यांगांना हक्काचे जे काही मिळाले, त्यात बच्चू कडू यांचा सिंहाचा वाटा मान्य करावा लागतो.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात त्यांना जे काम मिळाले होते, त्यात ते खूप समाधानी नव्हते. त्यांच्या अस्वस्थतेचे नेमके कारण त्यांनी कधी जाहीरपणे सांगितले नाही. पण, तेव्हा उघडपणे त्यांनी घेतलेल्या भूमिका फारच बोलक्या होत्या. पुढे विधानसभा निवडणुका लागल्या. महायुतीशी त्यांचा ताळमेळ बसला नाही. तिसरी आघाडी करून ते निवडणुकांना सामोरे गेले. अचलपूर मतदारसंघातून पाचव्यांदा आमदार होण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. ते कसे आणि कोणत्या कारणांनी भंगले हे त्यांनाच चांगले माहीत आहे. अपयशाने खचून जाणारा हा नेता नाही. दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी कायम आवाज बुलंद करणे हीच त्यांची ऊर्जा आहे. प्रत्येकक्षणी ते आंदोलन व आक्रमक भूमिकेत असतात. वेगवेगळ्या कारणांतून विद्यमान सरकारवर त्यांचा रोष आहे. निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. ते त्यांनी पाळावे आणि दिव्यांगांच्या मागण्या मंजूर कराव्या यासाठी त्यांनी अन्नत्याग आंदोलनाचे हत्यार उपसले होते. राष्ट्रसंतांच्या गुरुकुंज मोझरीतल्या या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकैत यांनी सर्वप्रथम हजेरी लावली. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे, संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी, आ. रोहित पवार या प्रमुख नेत्यांसह विरोधी बाकावरचे काही आमदार व खासदार आले तर काहींनी समर्थनाचे पत्र पाठविले. येऊन भाषण ठोकून गेलेल्या या मंडळींनी आपल्या प्रभाव क्षेत्रात बच्चू कडू यांचे आंदोलन उभे केले नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार, उबाठा गट यांनी समर्थन दिले पण आंदोलनाला बळ दिले नाही. एखाद दुसरा अपवाद सोडला तर मोझरी वगळता जेथे कुठे आंदोलन झाले ते फक्त प्रहारच्या कार्यकर्त्यांनीच केले. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांचा मोझरी बालेकिल्ला पण, त्यांनी प्रत्यक्ष न जाता जड अंत:करणाने पाठिंबापत्र काढले. या आंदोलना दरम्यान विरोधकांची एकजूट शक्ती बच्चू कडू यांच्या पाठीशी उभी राहिली नाही, हे वास्तव आहे. ती उभी असती तर चित्र वेगळे असते. ती का उभी राहिली नाही, त्याची कारणे वेगवेगळी आहेत. विरोधी नेते थकल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे नेते आंदोलनात पोहोचले. त्यांनी बच्चू कडू यांना ठोस आश्वासन देऊन आंदोलन थांबविले. हा थांबा तात्पुरता आहे, असे उपोषण सोडताना कडू यांनी सरकारला बजावले आहे.

अन्नत्याग आंदोलनातून थेट काही हातात आले नाही. पण, ज्या मागण्या होत्या त्या ऐरणीवर आल्या. काहींवर काम सुरू झाले तर काही तत्त्वतः मान्य झाल्या आहेत. पुढे काय होते, हे दिसेलच. बच्चू कडू यांनी एकट्याच्या जीवावर कार्यकर्त्यांना सोबत घेऊन हे आंदोलन उभे केले. फक्त काही अदृश्य हात त्यांच्या मदतीला होते आणि त्यात काही गैर नाही. एकमेकांना मदत केलीच पाहिजे. कोण कधी कोणाच्या कामात येईल हे गुवाहाटीतून लक्षात आले. आता राहिला प्रश्न शेतकरी कर्जमाफीचा! यापूर्वी तीनदा झाली पुढेही होईल. पण, हा काही शाश्वत उपाय नाही. शेतकरी कर्जबारीच होऊ नये अशी व्यवस्था उभी करण्यावर आपल्या सर्वांचा भर असला पाहिजे. हा विषय खूप व्यापक असला तरी राजकीय फायदा व तोट्याचा विचार न करता समजून घेतला तरच काही शक्य आहे. अन्यथा एकमेकांची फसवणूक होतच राहील.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

### प्रा. दिलीप जोशी


# पंचकोशातील प्राणमय कोश!

मागील आठवड्यात अन्नमय कोश म्हणजे आपला स्थूलदेह किंवा आपले शरीर होय. याबाबत आपण चर्चा केली होती. अन्नमय कोशानंतर येणारा कोश म्हणजे प्राणमय कोश. 'प्राण' या शब्दावरूनच लक्षात येईल की, प्राणमय कोश किती महत्त्वाचा!

प्राण गेला म्हणजे तो मनुष्य गेला. प्राण नसेल तर आपला देह मृत घोषित होतो. देह मृत झाला याची खात्री श्वासोच्छ्श्वास पाहून करतात. अजून सोपे केले तर प्राण गेला की नाही हे पाहण्यासाठी ढोबळमानाने नाकाजवळ बोट ठेवून श्वास चालू आहे का पाहतात. यावरून हे तर लक्षात येते की, आपला श्वासोच्छ्श्वास सुरू असेल तरच प्राण आहे आणि तो बंद झाला की प्राण गेला समजण्यासाठी लक्षात घेऊ की प्राणपाखरू उडाले म्हणजे प्राणमय कोश उडून गेला. याचा अर्थ अन्नमय कोशाच्या आत असलेला प्राणमय कोश आहे. प्राण म्हणजे श्वास बंद झाला की ते शरीर मृत झाले. अर्थात प्राण गेला.

आपल्या अन्नमय कोशाच्या आतील कोशाला प्राणमय कोश म्हणतात. यालाच सूक्ष्मदेह म्हणतात किंवा यालाच ऊर्जा शरीर असेही म्हणतात. हे ऊर्जा शरीर स्थूल शरीराला जिवंत ठेवते. प्राणमय कोश हा अन्नमय कोशाचे ऊर्जा कवच आहे. आपल्या स्थूलदेहाचे वर्तन होण्यासाठी लागणारी ऊर्जा प्राणमय कोश म्हणजे सूक्ष्मदेह देतो. जसे आपल्या घरातील शीतकपाट म्हणजे फ्रिज सुचारू राहण्यासाठी त्याची पिन विद्युत प्लगला जोडावी लागते अन्यथा तो फ्रिज केवळ ढाचा असेल. विद्युतशिवाय फ्रिज व्यर्थ. त्याप्रमाणेच अन्नमय कोशाला प्राणमय कोशाला जोडणे आवश्यक. दोहोतला संबंध तुटला तर ते केवळ मृत कलेवर राहील. 'चाले हे शरीर कोणाचीये सत्ते' तर त्याचे सामान्य उत्तर म्हणजे प्राणमय कोश म्हणता येईल. प्राणमय कोश म्हणजे चेतनऊर्जा आहे.

प्राणमय कोश हा श्वासोच्छ्श्वासाने पुष्ट होतो, ज्याला आपण




योगशास्त्रात प्राणायाम म्हणतो. प्राण म्हणजे वायू. असे १४ प्रकारांचे वायू आपल्या शरीरावर परिणाम करतात. यातील प्राणवायू, व्यान वायू, अपान वायू, उदान वायू आणि समान वायू हे पंचवायू महत्त्वाची भूमिका पंचकोश पुष्टीकरणात घेतात.

प्राणवायू श्वास क्रियेत असतो. तो शरीराला पुष्ट करतो. तो नाकापासून हृदयापर्यंत कार्यरत असतो. अपानवायू नि:श्वास क्रियेतून उत्सर्जन क्रिया अर्थात विषहरण करतात. तो नाभीपासून पायापर्यंत असतो. समान वायू आंतरिक गतिविधीमध्ये मानसिक विकासात मदत करतो. तो हृदयापासून नाभीपर्यंत असतो. उदान वायू स्वर उच्चारणात महत्त्वाची भूमिका घेतो. तो गळ्यापासून मस्तकापर्यंत असतो. व्यान वायू शरीर आकुंचन क्रियेत प्राण ऊर्जा शरीरात सर्वत्र पोहोचवतो आणि समन्वय साधतो. त्याचा संपूर्ण शरीरभर संचार असतो. प्राण म्हणजे हृदयाची धडकन होय. प्राणमय कोश अन्नमय कोशाची एका अर्थाने बॅटरी आहे. बॅटरी जर उतरली तर तो मोबाईल केवळ डब्बा तद्वतच प्राणमय कोशाशिवाय अन्नमय कोश म्हणजे प्रेत होय. खरं सांगायचं तर प्राणमय कोश हा अन्नमय कोश आणि मनोमय कोश यांना जोडणारा पूल आहे. कारण जेव्हा शारीरिक हालचाली वाढतात तेव्हाही प्राण वाढतो आणि मानसिक चढउतार झाला तरीही प्राण वाढतो. अन्नमय कोश तेव्हाच व्यक्त होतो किंवा वर्तन करतो जेव्हा आपला प्राणमय कोश सक्रिय असतो. आपले बोलणे म्हणजे श्वासच आहे. आपला स्थूल देह निरनिराळ्या क्रिया करते म्हणजे प्राणमय कोश त्या क्रिया ऊर्जा प्रदान करून करवून घेतो. 'जितनी चावी भरी रामने' ही कल्पना करा. यातील खिलौना म्हणजे अन्नमय कोश आणि चावीमुळे निर्माण झालेली ऊर्जा म्हणजे प्राणमय कोश.( गतिज आणि स्थितिज ऊर्जा) प्राणमय कोश म्हणजे सूक्ष्मदेह म्हणजे ऊर्जादेह.

ऊर्जेचे सहा प्रकार म्हणजे उष्णता, प्रकाश, विद्युत, चुंबकीय, ध्वनी आणि घर्षण होय. या सर्व ऊर्जा आपल्या शरीरात कार्यरत आहेत. हाच प्राणमय कोश होय. आपल्या शरीरात 'प्राण' आपल्या नेत्रात, हृदयात आणि मस्तिष्कात स्थित असतो. प्राचीन ऋषिमुनींनी यावर अनेक भाष्ये केलेली आहेत. तैत्तिरीय उपनिषदात महर्षी वरुण आणि भृगू संवादात प्राणच ब्रह्म म्हटले आहे.

**प्राणो ब्रह्मेति व्यजानात । प्राणाद् एव खल्विमानि**
**भूतानि जायन्ते । प्राणेन जातानि जीवन्ति।**
**प्राणं प्रयन्त्यभिसंविशंतीति ॥**

आपल्या शरीरात ७२ हजार नाड्या आहेत. ईडा, पिंगळा, सुषुम्ना याबाबत आपण अनेकदा ऐकतो. प्राणमय कोशाला पुष्ट करण्यासाठी भ्रामरी, अनुलोमविलोम, भस्त्रिका, कपालभाती, शितली, उज्जयी, उद्गीथ इत्यादी श्वासक्रिया सांगितल्या आहेत. आपले जिवंत असणे किंवा मृत होणे हे प्राणमय शरीराच्या हातात आहे. हा कोश आपले ऊर्जा आवरण आहे. आपली जीवनशक्ती प्रवाहित करणारा हा कोश आहे. अन्नमय कोशानंतर असणारा हा दुसरा कोश असून सर्वांगीण विकासाचा प्राण म्हणजे प्राणमय कोश होय. प्राणतत्त्वालाच पंचप्राण म्हटले आहे. प्राणमय कोश आपल्या जिवंतपणाचे प्रमुख केंद्र आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### सुरक्षित प्रवास करायचा कसा?

मानवी जीवन एक प्रवास आहे. सुख आणि दु:ख याचा अनुभव घेत आपला प्रवास सुरू असतो. हा प्रवास केव्हा, कुठे आणि कसा संपेल, काही सांगता येत नाही. याचा कटु आणि अत्यंत वाईट अनुभव नुकत्याच झालेल्या विमान प्रवास अपघाताने दिला. या विमानाने जे इंग्लंडकडे आनंदाने जाण्यास निघाले, त्यांची काही क्षणात राख झाली. जीवन किती क्षणभंगुर आहे याचा अत्यंत करुण अनुभव देऊन गेले. अलिकडे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. बस, रेल्वे, कार अपघात केव्हा, कसा होईल काही सांगता येत नाही. त्यामुळे आपण आपली काळजी, सुरक्षा राखणे गरजेचे आहे आणि ज्यांच्या विश्वासावर आपण प्रवास करतो त्यांनी सतत जागृत राहून प्रवास करणाऱ्यांची सुरक्षा कायम ठेवली पाहिजे. असेच जर अपघात होत राहिले तर लोकांनी प्रवास कसा करावा? त्याचा आनंद कसा घ्यावा? हा अतिशय मूलभूत प्रश्न आहे. अपघाताचे कारण कोणते याचा शोध लागेल परंतु या अपघाताने जी जीवितहानी झाली ती कशी भरून निघेल? ही हानी केवळ नुकसानभरपाई देऊन भरून निघेल काय? श्वास रोखून प्रवास कसा आणि किती करावयाचा? हे सारे प्रश्न लोकांच्या मनामध्ये निर्माण होऊ लागले आहे . या विमान अपघाताने केवळ अपघात संबंधित नातेवाईकांसमोरच नव्हे, तर सर्वांसमोर प्रश्नचिन्ह उभे केले आहे . आपला संपूर्ण जीवनप्रवास नेहमीच सुखद होणे केवळ आपल्याच हाती नाही तर, त्याचबरोबर सरकारवर देखील अवलंबून आहे. सरकार त्यासाठी प्रयत्न करीत आहे. शेवटी आपण आणि आपले नशीब, असे म्हणत जीवन जगणे हाच उपाय आपल्या हाती शिल्लक आहे.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### अपघाताला दोषी कोण?

पुण्यापासून ३० कि. मी. आणि तळेगाव दाभाडेपासून २ कि.मी अंतरावर असलेल्या कुंडमळा येथे असलेल्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त पर्यटक उभे राहिल्याने तो कोसळला आणि काही पर्यटकांचा जीव गेला, काही जखमी झाले आणि काही नशीबवान बचावले. या दुर्दैवी घटनेमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ही घटना घडली असा थेट आरोप केला जात आहे. वस्तुतः या पुलाच्या दुरुस्तीची निविदा मंजूर झाली असून काही दिवसांत काम देखील सुरू होणार होते. पूल बांधकाम अंकेक्षण हे त्याच्या बांधकामाच्या उद्दिष्ट अंतर्गतच होईल. मुळात हा पूल शेतकऱ्यांना पायी जाण्यासाठी अरुंद तयार केला होता. त्यानुसार तो पूल भार सहन करीत होता. त्यावर जेवढा भार अपेक्षित आहे त्यानुसार त्या स्थितीत आहे.मात्र पावसाळ्यात पर्यटक निसर्ग सौंदर्याकडे आकर्षित होतात आणि आनंद लुटण्यासाठी गर्दी करतात. या पुलाच्या अपघातात असेच घडले. सर्व दुचाकी घेऊन एकाच जागेवर जमले आणि तब्बल २०० पर्यटक आणि त्यांच्या दुचाकींच्या वजनाने तो पूल कोसळला. यात दोषी कोणाला ठरविणार? जो मार्ग पादचारी नागरिकांसाठी आहे तेथे गर्दी झाली तर अपघात होणारच. अशा अनेक घटना या आधी देखील घडल्या आहेत. पण उत्साहात याकडे दुर्लक्ष होते आणि त्याची किंमत जन्मभर चुकवावी लागते, यापेक्षा दुर्दैव ते काय?

**संजय पाठक**/नागपूर

### स्त्रीसन्मान; संस्कृतीची खरी ओळख!

प्राचीन काळात स्त्रीला केवळ एक सामाजिक घटक नव्हे, तर 'हिंदू संस्कृतीचा कणा' या दृष्टीने सन्मानाने पाहिले जात होते. आजच्या आधुनिक समाजात स्त्रियांना कायदेशीर अधिकार, समानता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळत आहेत. मात्र, प्राचीन भारतात स्त्रियांना मिळणारा मान आणि सन्मान आजच्या २१व्या शतकात हरवलेला दिसतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे! केवळ हुंडाबळीच नव्हे, तर स्त्रियांवरील मानसिक व शारीरिक शोषण, बलात्काराच्या वाढत्या घटना या सर्वांवरून समाजाची स्त्रीकडे बघण्याची विकृत मानसिकता स्पष्ट होते. म्हणूनच, केवळ कायद्याच्या आधारे नव्हे, तर समाजाची मानसिकता बदलल्यावरच खऱ्या अर्थाने स्त्रीसन्मानाची परंपरा जोपासली जाऊ शकते. यासाठी प्रत्येक घरात साधनेचा संस्कार होणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्राचीन हिंदू संस्कृतीतील स्त्री सन्मानाची मूल्ये जोपासण्यास मदत मिळेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### शिक्षकांच्या पगारात तफावत नको

सोलापूर शहरात महानगरपालिका व खाजगी प्राथमिक शाळा बऱ्याच प्रमाणात आहे.येथे काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दर महिन्याला वेतन मिळते. यात खासगी शाळेतील शिक्षकांना शासनातर्फे अनुदान असल्यामुळे त्यांचा पगार एक ते पाच तारखेच्या दरम्यान दर महिन्याला होतेच, पण महानगरपालिकेत काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याला कधी होईल हे सांगताच येत नाही. याचे परिणाम मनापात कार्यरत असलेल्या शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक ,कर्मचारी यांच्या परिवारावर होत आहे. वेळेवर पगार न होत असल्यामुळे आजारावरील खर्च, किराणा खर्च, मुलांचे शैक्षणिक खर्च व इतर दैनंदिन खर्च हे करणे म्हणजे आजच्या युगात तारेवरची कसरत आहे. तरी कृपया शासनाने मनपात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चित अशा एका तारखेला जाहीर करून त्याच तारखेच्या आत पगार अदा करावे. ही नम्र विनंती.

**फैय्याज शेख, सोलापूर.**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# प्राधान्यक्रम ठरवून निधी मागणीचे प्रस्ताव तत्काळ सादर करावेत- जिल्हाधिकारी

## सन २०२४-२५ च्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जून**
जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतच्या कामाबाबत लोकप्रतिनिधीशी समन्वय साधून व प्राधान्यक्रम ठरवून निधी मागणीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, सहायक जिल्हाधिकारी योगेश मीना, जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे, समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व कार्यालय प्रमुखांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२४-२०२५ च्या कामावर केलेल्या खर्चाचा ताळमेळ तात्काळ पूर्ण करुन उपयोगिता प्रमाणपत्रासह अहवाल सादर करावा. तसेच अखर्चित निधीची माहिती तात्काळ सादर करावी. तसेच सन २०२५-२६ या वर्षात करावयाच्या कामाचे योग्य नियोजन करुन निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी कृषी, पशुसंवर्धन, महावितरण, आरोग्य, क्रीडा, पाणीपुरवठा, नगरविकास, तीर्थक्षेत्र, पर्यटन क्षेत्रावरील सन २०२४-२५ च्या खर्चाचा तसेच सन २०२५-२६ प्रस्तावित खर्चाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांना आपल्या गावापासून शाळेत नेआण करण्यासाठी मानव विकास अंतर्गत नवीन आलेल्या बस आहेत. या बससाठी शिक्षण विभागाने रुट प्लॅन तयार करुन द्यावा, अशा सूचना दिल्या.

जिल्ह्यातील हिंगोली या आकांक्षीत तालुक्यात केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार महिला व बालकांना देण्यात येणारे पोषण आहार, प्रधानमंत्री आवास योजना, ओडीएफ प्लस गावे, जलजीवन मिशन, कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, ज्या अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा नाही त्या ठिकाणी शौचालय उभारणे यासह निर्धारित निर्देशांकानुसार सर्व सुविधा उपलब्ध करुन द्यावेत. केलेल्या कामाची छायाचित्रे, माहितीचा डेटा अपलोड करावा व निती आयोगाकडून बक्षीस पात्र ठरवावेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

देशातील आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही योजना हिंगोली जिल्ह्यातील ८१ गावांमध्ये विविध १७ यंत्रणेमार्फत राबविण्यात येणार आहेत. या अभियानाच्या पहिल्या टप्यात १५ ते ३० जून या कालावधीत लाभार्थ्यांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी हे समन्वय अधिकारी असून त्यांनी सर्व विभागाशी समन्वय ठेवून हे शिबीर यशस्वी होण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या. या बैठकीस विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# औंढा महसुल अधिकारी, कर्मचाऱ्यांचे लेखणीबंद आंदोलन

## अधिकाऱ्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जून**
औंढा नागनाथ येथील महसूल अधिकारी व कर्मचारी विरोधात अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या राजकीय पदाधिकारी विरोधात कार्यवाही करण्याची मागणी करीत बुधवारी काळया फिती लावून लेखणी बंद आंदोलन करण्यात आले. आंदोलनात नायब तहसीलदारांसह महसूल कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

औंढा नागनाथ तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी ११ जून रोजी शासन विरोधात एका राजकीय पक्षाने ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन केले होते. मोर्चा तहसील परिसरात आल्यानंतर छोटेखानी सभा आयोजित करून काही पदाधिकाऱ्यांनी मोर्चेकरींना संबोधित केले. यावेळी एका पदाधिकाऱ्याने औंढा तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना वैयक्तिकरित्या अवमानकारक शब्दांचा वापर करीत सार्वजनिक ठिकाणी बदनामी केल्याचा ठपका ठेवीत महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत त्या पदाधिकारी विरोधात कार्यवाहीची मागणी केली होती. त्यानंतर सोमवार दिनांक १६ जून पासून वक्तव्याचा निषेध करीत काळया फिती लावून कामकाज केले, तर बुधवार दिनांक १८ जून पासून संघटनेतर्फे लेखणी बंद आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे. आंदोलनात नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, पुरवठा निरीक्षण हेमा खाडे, जिल्हाध्यक्ष इम्रान पठाण, श्रीकृष्ण दराडे, आनंद दातार, महेश हिवरे, शेख हमीद, भास्कर खंदारे, संगीता बावनपल्ले, कल्याणी हटवार, सचिन क्षीरसागर,नितीश कुलकर्णी, नामदेव घोणे, वामन मोरे, कैलास जाधव आदी सहभागी झाले होते.

# धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत शिबीरे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जून**
देशातील आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान ही योजना दि. २ ऑक्टोबर, २०२४ पासून मा. पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्यक्षेत्रे व १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. भारत सरकारने आदिवासी समुदायांचे सशक्तीकरण करण्यासाठी प्रधानमंत्री जन जाती न्याय महाभियान आणि धरती आबा जन जातीय ग्राम उत्कर्ष अभियान या दोन महत्वाच्या आणि कालबच्द मोहीम हाती घेतल्या आहेत. देशभरातील आदिवासी भागांमध्ये सेवा व पायाभूत सुविधा संतृप्त करणे हा या दोन्ही उपक्रमांचा उद्देश आहे. याव्दारे आदिवासी जमातींचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याचे उहिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर जनजातीय कार्य मंत्रालयाने १५ जून ते ३० जून, २०२५ या कालावधीत धरती आबा या अभियानाच्या माध्यमातून जनजागृती करणे व लाभार्थ्यांना विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. आदिवासी जमातीच्या शेवटच्या टप्यापर्यंत वैयक्तीक लाभ पोहोचवणे आणि धरती आबा जनजागृती उत्कर्ष अभियानाची जनजागृती निर्माण करणे हा याअभियाना चा उद्देश आहे. हे अभियान हिंगोली जिल्ह्यातील ८१ गावामध्ये राबविण्यात येणार आहे. परंपरागत आईसी मोहिम वेगळे म्हणून या अभियानामध्ये गावपातळीवर क्लस्टर पातळीवरील शिबीरे आयोजित करुन विविध विभागांशी समन्वय साधून योजनांचा लाभ पात्र आदिवासी व्यक्ती व कुंटुंबापर्यंत पोहोचवला जाईल. ही शिबीरे १५ जून ते ३० जून, २०२५ या कालावधीत गाव, क्लस्टर पातळीवर लाभ संतृप्ती शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबीरामध्ये मोठ्या संख्येने आदिवासी बांधवानी सहभाग नोंदवावा व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कळमनुरीचे प्रकल्प अधिकारी डॉ. सुनिल बारसे यांनी आदिवासी नागरिकांना केले आहे. याशिवाय या अभियानात सिकलसेल आजाराविषयी जनजागृती व तपासणी शिबीर, सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबीर, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, लहान मुले यांच्यासाठी पोषण शिबीर, क्षयरोग तपासणी शिबीर यावरही भर दिला जाणार आहे.



**हिंगोली- राज्य शासनाने विद्यार्थीनींना शाळेतच मोफत बस पासेसचा निर्णय घेतला आहे. येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातील विद्यार्थीनींना एस टी महामंडळाचे वाहतुक निरीक्षक फिरोज शेख आणि उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट यांचेहस्ते शाळेत मोफत पासेस वाटप करण्यात आल्या. यावेळी वरिष्ठ कारकून संतोष बांगर, अविनाश लिंबाळकर, बंटी बांगर, अविनाश दराडे आदी.**

## संक्षिप्त वृत्त

### ५६३ ग्रामपंचायतींना आता एकच रंग


हिंगोली- जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या संकल्पनेतून व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड यांच्या नेतृत्वात हिंगोली जिल्ह्यातील ५६३ ग्रामपंचायतीच्या इमारती एक रंगात करण्याच्या कामास मागील आठवड्यात सुरुवात झाली आहे. सर्व ग्रामपंचायत इमारतीत स्वतंत्र शौचालय, बैठक व्यवस्था, संगणक संच, पिण्यासाठी पाणी, नियमित स्वच्छता, ऑफिससाठी खुर्ची, टेबल, अभ्यांगतासाठी स्वतंत्र खुर्च्या, प्रिंटर, वायफाय, इन्व्हर्टर इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सर्व गटविकास अधिकारी यांनी तालुकास्तरावर सर्व ग्रामसेवक यांच्या बैठका घेऊन नियोजन केले आहे. यासाठी ग्रामपंचायतींनी १५ वा वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायत स्तरावर खर्च करावयाचा आहे. याबाबत दर आठवड्याला गटविकास अधिकारी यांचा आढावा घेऊन कामास गती देण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिले आहेत. या उपक्रमासाठी विष्णू भोजे यांना जिल्ह्याचे समन्वयक म्हणून नेमण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेने दिली आहे.

### शाहीर शामराव धोंगडे यांचा सत्कार



शिरड शहापूर- पुणे येथे अखील भारतीय मराठी शाहीर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील तळागाळातील लोक कलावंतांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. यावेळी हिंगोली जिल्ह्यातील शाहीर शामराव नारायणराव धोंगडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अखील भारतीय मराठी शाहीर परिषदेचे अध्यक्ष रमेश कदम, शाहीर सम्राट देवानंद माळी, विनोदी ढगे, अप्पासाहेब उगले, सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### आंबादास देव यांचे निधन



हिंगोली- शहरातील सरस्वतीनगर भागातील रहिवासी व सरजूदेवी आर्य कन्या विद्यालयातील शिक्षक लक्ष्मीकांत देव यांचे वडील अंबादासराव जनार्धन देव वय ९० वर्षे यांचे सोमवार दिनांक १६ जून रोजी संध्याकाळी सहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे.

# सिंधूताई दहीफळे यांच्या पुस्तकाची राज्य सरकारने घेतली दखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जून**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या समग्र शिक्षा आणि पीएमश्री अंतर्गत ग्रंथालय समृध्दी राज्यस्तरीय उपक्रमासाठी राज्यातील शिक्षकांचे लिखाण मागविण्यात आले होते. त्यासाठी राज्य सरकार शिक्षण विभागाकडून तीन ते पाच, सहा ते आठ, आणि नववी ते बारावी अशा वर्गासाठी विविध लेखन प्रकार मागविण्यात आले होते. त्यात सौ.सिंधूताई दहिफळे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका राहोली खुर्द यांनी सहा ते आठ स्तरासाठी धोंडीराम झाला जिल्हाधिकारी ही स्वलिखित किशोर कथा पाठविली होती. त्याची निवड जिल्हा ते राज्यस्तरावर तज्ञ निवड समितीकडून निवड होवून ते पुस्तक प्रकाशित झाले आहे. सिंधूताई दहीफळे या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका आहेत. ते पुस्तकं महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी उपलब्ध झाले आहे दहिफळे यांचे साहित्य निर्मिती क्षेत्रात मोठे योगदान आहे त्यांनी या पूर्वी त्यांच्या सात पुस्तकातून समाजउपयोगी साहित्य निर्मिती केली आहे.

धोंडीराम झाला जिल्हाधिकारी ही पहिलीच किशोर कथा विद्यार्थ्यांना नवचैतन्य देणारी आहे. परिस्थितीवर मात करण्यास भाग पाडणारी आहे. आणि एक मेका करू साह्य,अवघे धरू सुपंथ हे वाक्य सार्थ ठरविणारी आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहोली खुर्द येथे त्यांचा नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी टेकाम, मुख्याध्यापक गजानन बोरकर, जाधव, सौ.उज्ज्वला नर्सिकर, घोंगडे, सौ.क्रांती काळे, सौ. लता राठोड, सौ.विजयता इंगोले सरपंच सचिन गरड, शा.व्य.समिती अध्यक्ष रमेश गरड आणि विद्यार्थ्यांकडून सत्कार करण्यात आला.

# जवळा बाजार येथे जुन्या वादातून दोन गटात हाणामारी, एकजण गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जून**
औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे जुन्या वादातून दोन गटात हाणामारी व दगडफेकीची घटना घडली आहे. यामध्ये एकजण गंभीर जखमी झाला असून खाजगी रूग्णालयाचे नुकसानही झाले आहे. गावात सध्या तणावपूर्ण शांतता आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे सुमारे दीड महिन्यापूर्वी दोन गटात वाद निर्माण झाला होता. या वादातून एका गटातील तरूणाच्या हाताला दुखापत झाली होती. मात्र याप्रकरणी गुन्हा दाखल झाला नव्हता. दीड महिन्यापासून वादातून किरकोळ कुरबुरी सुरूच होत्या. दि १७ जून रोजी पुन्हा एकदा दोन गटातील वाद उफाळून आला. यामध्ये दोन गट समोरासमोर आले. त्यांनी दगडफेक करण्यात सुरूवात केली. तसेच एका तरूणाला काठीने मारहाण केली. या मारहाणीत एक तरूण गंभीर जखमी झाला.

या घटनेची माहीती मिळताच पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, पोलिस निरीक्षक विकास पाटील, पोनि जी एस राहीरे, उपनिरीक्षक माधव जिव्हारे यांचयसह पथकाने वाढीव बंदोबस्त घेऊन घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जमाव पागविला. माक्ष झालेल्या दगडफेकीत एका खाजगी रूग्णालयाचेही नुकसान झाले.

या घटनेच्या निषेधार्थ डॉक्टर्स संघटनेच्यावतीने बुधवारी बंद पाळण्यात आला. सध्या गावात तणावसदृश परिस्थिती असून वाढीव पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. याप्रकरणात वैभव ढेंबरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून औंढा पोलिसांनी शेख फारूख, शेख माजीद, शेख फिरोज, शेख नदीम, सय्यद फैजल, शेख लबली, शेख गुड्डुराज यांच्यासह अन्य सात जणांवर जातीवाचक शिवीगाळ करणे व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रामलीला मैदानावर संत नामदेव महाराज पालखीचे पहिले अश्व रिंगण





**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १८ जून**
श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांची पालखी दि १७ जून रोजी सायंकाळी हिंगोली शहरात दाखल झाली. या पालखीचे नगर हिंगोलीकरांनी भव्य स्वागत केले. त्यानंतर येथील रामलीला मैदानावर डोळ्याचे पारणे फेडणारे अश्व रिंगण पार पडले. यावेळी शेकडो भाविक, वारकरी तसेच प्रशासनातील अधिकारी, राजकीय पुढारी यांनी संत नामदेव महाराजांच्या पालखीचे दर्शन घेत रिंगण सोहळ्यात उत्साहात सहभाग घेतला.

नर्सी नामदेव येथील श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांची पालखी हिंगोली शहरात दाखल होताच पालखीचे अग्रसेन चौकात भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी पालखीचे पूजन केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, सदस्य मनोज आखरे, द्वारकादास सारडा, ॲड मनिष साकळे, अशोक नाईक, माजी नगराध्यक्षा अनिता सुर्यतळ, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, चंद्रकांत लव्हाळे आदींची उपस्थिती होती.

टाळ मृदंगाच्या गजरात तसेच हरिनामाचा जयघोष करीत शहरातील प्रमुख मार्गावरून संत नामदेव महाराजांची पालखी जात असतांना हजारो भाविक पालखीचे दर्शन घेत होते. ठिकठिकाणी वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व चहाची व्यवस्था करण्यात आली होती. प्रमुख मार्गावरून पालखी येथील रामलीला मैदानात सायंकाळी पोहोचली. याठिकाणी दरवर्षी प्रमाणे संत नामदेव महाराजांच्या पालखीचे पहिले अश्व रिंगणाची तयारी प्रशासनाच्यावतीने करण्यात आली होती. या रिंगणात १२ अश्व माजी नगरसेवक अशोक नाईक यांच्या पुढाकारातून बोलावण्यात आले होते.

पहिले अश्व रिंगण सोहळ्याला सुरूवात झाल्यानंतर अश्वांनी संत नामदेव महाराजांच्या पालखीला रिंगण घालण्यात सुरूवात केली. यावेळी शेकडो भाविक आणि वारकऱ्यांनी हरिनामाचा जयघोष करीत रिंगण सोहळ्याचा आनंद लुटला. त्यानंतर वारकऱ्यांनी खांद्यावर भगव्या पताका घेत रिंगण सोहळ्यात तर महिलांनी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन रिंगण सोहळ्यात सहभाग घेतला. हा सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक तसेच हिंगोलीकर रामलीला मैदानावर दाखल झाले होते. रामलीला मैदानावर हरिनामाचा गजर करीत भाविकांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. डोळ्याचे पारणे फेडणारा हा सोहळा भाविकांनी डोळ्यात साठवून ठेवला. ही पालखी दि १८ जून रोजी औंढा नागनाथकडे सकाळी रवाना झाली.

# १ लाखाचे करुन देतो १ कोटी रुपये!

## भोंदुबाबा रतन लांडगेच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भोंदू बाबा रतन आसाराम लांडगे यांच्यावर तालुका जालना पोलिस ठाण्यात एका लाखांचे एक कोटी रुपये तयार करून देतो म्हणून मिरचपुर धुळे येथील फिर्यादीवरून तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, दिनांक १६/०६/२०२५ रोजी फिर्यादी नामे किशोर पंडित शेवाळे, वय ४८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. पेरेजपुर, ता. साकी, जि. धुळे यांनी दिली कि, त्यांना रतन आसाराम लांडगे याने एक लाख रूपयाचे एक कोटी देतो असे आमीष शोधून त्यांच्याकडून ३ लाखे व पुतण्याकडुन २ लाख घेवुन ५० रूपे त्याच्या राहत्या घराण्यातील समक्ष जादुचे जादुचे वापरतात. शोधले. व त्यांची एकुण ५,५०,०००/–रूपयांची फसवणूक के घटना घडली सांगून पो. तालुका जालना गु.र.न. ४०५/२५, कलम ३१८(४), ३१९(२), ३५२, ३५१(२) भा.न्या. सह कलम ३ महाराष्ट्र नळबळी व इतर आमानु, अनीष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध कायदा २०१३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्यातील वय ४५ रतन आराम लांडगे, वर्षे वर्ष, रा. देव जालनाच्या राहत्या घराची गुन्यातील घटनास्थळ व व्यवसाय दोन ठिकाणी कर्मचारी नगर, घरझडती उल्लेखनीय नमुद दलास, इसम पदमनाभ जयप्रकाश, वय ४१ वर्षे, निर्माता, रा. द नेस्ट कॉ. ऑप. समाज, मुलुड पश्चिम, मुंबई ८०, विकास वसंत अनभवने, वय ४१ वर्षे, व्यवसाय नाही, रा. कोकणगनर, भांडूप, पश्चिम, मुंबई, ७८, नारायण गजानन जोशी, वय ५२







वर्षे, व्यवसाय – चहाची टपरी, रा. साईप्लाझा बिल्डींग, रुम नन. ११ विरा पश्चिम, मुंबई ७७ हे आले. सदर इसम प्रदेश १ लाख रुवुन आले होते. त्यांना एकाचे लाख ३ रूपे करून आम्ही असे दाखवले होते. तसंच तसंच आपल्या घराची जडणघडण त्याच्या घराला झळकली आहे.

१. एक लोखंडी जाडीचा पिंजरा, २. एक लाकडाची विना, ३. पितळाची वेळी, ४. एक कायारंगाच्या भालुचा मारक, ५. एक चमचम्याचा मॅट ज्यावर वाघाचे चित्र आहे, ६. एक प्लास्टीकची छडी ज्यावर मानव हाडा कवटीचा आकार आहे., ७. प्लास्टीकची मानव कवटी, दोन पाय व दोन हात, पाच बोट प्लास्टीक चा पंजा, ८. स्टील हदळ, कुंकुचापंच, ९. चार नारळ, १०. हदळ, कुंकुची एक–एक पुडी, ११. एक स्टीलचा तांब्या आणि स्टीलचा एक लहान ग्लास, १२. कायारंगाची कपड्याची बाहुली, १३. एक स्टीलचा कोयता ज्याची मुठ आंखड असुन शब्द घोडयाचे चिन्ह आहे, १४. भगव्यारंगाचा महाकाल लिहिलेला कुर्ता, १५. एक चाकु ज्याची सामना आहे., १६. लाल रंगाचा कापड, १७. भगव्या रंगाचा ज्यावर महाकाल असे लिहिलेले रुमाल, १८. १०८ तुळशीमनी माळ, १९. ८०००/– तिन्ही पांढऱ्या गोण्यातील नोटांचे आकाराचे कापलेले कागदपत्रे बंडल एका गोणीत सोळा बंडलवर प्रत्येकी ५०० रु.ची नोट लावली होती.

सदर गुन्ह्यातील गुन्ह्यातील गुन्ह्यातील गुन्ह्यात यास घेवोकडे गुन्ह्याकडे विचार केला आहे त्याने त्याची कबुली घडलेली सदर गुन्ह्यात दिनांक १७/०६/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच तार्केडुन १,०००/– रू स्वीकार ४ हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा मा. अजयकुमार बन्सल, पोलिस अधीक्षक, जालना, मा. आयु नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, जालना, मा. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना यांच्या मार्गदर्शनातून मा. संतोष साबळे, पोलीस निरीक्षक, अतुल पाटील, सहा. पोलिस निरीक्षक, पो.ह. २५० गाडेकर, पोकॉ १५११ शेंडीवाले, पोकॉ १५६५ माळी, पोकॉ १४६२ काळे, मपोकॉ १२२४ जाधव सर्व नमुने पो.स्टे. तालुका जालना यांनी असुन सदर गुन्ह्याचा अधिक सहा. पोलीस निरीक्षक, अतुल पाटील हे करत आहेत.

# संक्षिप्त

## राष्ट्रवादीच्या कार्यालयामध्ये राजमाता जिजाऊ यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, शहर उपाध्यक्ष प्रतापराव लहाने व युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे यांनी राजमाता जिजाऊ यांची प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. यावेळी अंबड तालुकाध्यक्ष सतीश ढवळे मागासवर्गीय आघाडी जिल्हाध्यक्ष संगीता झाडीवाले, जिल्हा सरचिटणीस संदीप राठोड, ग्रंथालयाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ लोखंडे, युवक जिल्हा कार्याध्यक्ष किशोर सवडे, सेवादलाचे सिद्धेश्वर शिंदे,गणेश डूकरे,तालुका उपाध्यक्ष भगवान दाभाडे सागर ठाकूर युनाफ शेख व्यापार व उद्योग सेलचे शहर उपाध्यक्ष जावेद देशमुख, गणेश खरात,राहूल राठोड व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## एक दिवस तरी वारी अनुभवावी –राजाभाऊ देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

आषाढी एकादशीला विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक भाविक दिंडीच्या माध्यमातून पायी चालत पंढरपूरला जात असतात. महाराष्ट्रातील या दिंड्यांना एक ऐतिहासिक महत्त्व आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष माजी आ हर्षवर्धन सपकाळ यांच्या सुचणेवरून ते स्वत: दि २४ जुन २५ मंगळवार रोजी दिवसभर यवत ते वरवंड दिंडी क्र: २८२ मध्ये सकाळी ७ वाजेपासून पायी सहभागी होणार असून जालना जिल्हातील सर्व इच्छुक भाविक भक्त व जिल्हा काँग्रेस कमिटीचे आजी माजी पदाधिकारी,कार्यकर्ते यांना या पायी दिंडीत सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी आपले नावे दि २० जुन २५ पर्यंत ९२७००५९६७१ या नंबर पाठविण्याचे आवाहन काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी केले आहे.



## ज्ञानसागर माध्यमिक विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ आणि चॉकलेट्स देऊन उत्साहपूर्ण स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

सिपोरा अंभोरा येथील ज्ञानसागर माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात आणि आनंदात स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात रंगीबेरंगी फुगे, फुलांची सजावट आणि चॉकलेट्सच्या मधुर भेटींनी विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. प्राचार्य एस. टी. दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षक सोरमारे, सोनुने, लव्हाळे, . बरकले, . कांबळे, पंडित, भवर, कोतवाल, सुरुशे, उखर्डे, भोपळे, अंभोरे,नवले मॅडम, गिरी मॅडम आणि इतर शिक्षकवृंद तसेच कर्मचारी यांनी एकत्र येऊन हा आनंदमयी सोहळा साजरा केला. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचा शैक्षणिक प्रवास उत्साहपूर्ण व्हावा, यासाठी शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला चॉकलेट्स देऊन स्वागत केले. प्राचार्य श्री. दिवटे म्हणाले, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास हाच आमच्या शाळेचा पाया आहे. त्यांना प्रेम आणि प्रोत्साहन देऊन आम्ही त्यांचा शैक्षणिक प्रवास सुखकर बनवू इच्छितो. विद्यार्थ्यांनीही या स्वागताने आनंद व्यक्त केला आणि नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात करण्यासाठी उत्साहित झाले. हा सोहळा केवळ स्वागतापुरता मर्यादित नव्हता, तर यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती आपुलकी आणि शिक्षकांप्रती आदराची भावना निर्माण झाली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नव्या वर्षात मेहनत, शिस्त आणि यश मिळवण्यासाठी प्रेरित केले. या उत्साहपूर्ण सुरुवातीमुळे ज्ञानसागर माध्यमिक विद्यालयाने नव्या शैक्षणिक वर्षाची दमदार सुरुवात केली आहे.

# मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरणासंदर्भात जालन्यातील शाळांमध्ये जनजागृती मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या सहकार्याने लायन्स क्लब जालना आणि सिव्हील क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आझाद मैदानजवळील सिव्हील क्लबमध्ये २४ जून रोजी ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण करण्यात येणार असून, प्रत्येक शाळांमध्ये लसीकरणाबाबत जनजागृती केली जात आहे. बुधवार दि. १८ जून रोजी या अभियानाच्या अनुषंगाने देऊळगावराजा रोडवरील राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मराठी व इंग्रजी माध्यम, सीटीएमके गुजराती विद्यालयात आयोजित कार्यक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ९५० मुलींना सर्वाइकल कॅन्सरबाबत माहिती देण्यात येऊन लसीकरण करून घेण्याचे आवाहन करण्यात आले



यावेळी मार्गदर्शक म्हणून वीरा मेडीसीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रणौती हीरळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनीष अग्रवाल, इंग्रजी माध्यमच्या प्रिन्सिपल रीता टंडन, उपमुख्याध्यापक गिरीश दशरथ, शिक्षिका लीना काळे, अनीता नागोरी, जयंत केन्द्रे, लायन्स क्लबच्या सचिव मंजु श्रीमाली, अतुल लड्ढा, विठोबा दराडे, पी. के. खरात, बळीराम बेन्द्रे, डॉ. संगीता श्रोत्रिय, योगेश डाके आदी उपस्थित होते. डॉ. हिरळकर यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधून सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, तो कशामुळे होतो आणि त्यापासून बचाव करण्यासाठी लसीकरण किती महत्त्वाचे आहे यावर सखोल माहिती दिली. गर्भाशयाच्या या आजाराबाबत महिला अनभिज्ञ असतात. यामुळे वेळेत निदान होत नाही. जर वयाच्या ९ ते १८ व्या वर्षी लस घेतली, तर भविष्यात गंभीर आज–ाराचा धोका मोठ्या प्रमाणावर टाळता येतो, असे सांगून डॉ. हीरळकर यांनी मुलींना योग्य वयात लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनींनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना डॉ. हिरळकर यांनी उत्तरे दिली. यावेळी मुलींना संमतीपत्र वाटप करण्यात आले.



# भोकरदन येथे अवैध वृक्षतोड घेऊन जाणारा ट्रकवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील दगडवाडी येथील दगडवाडी–भोकरदन रस्त्यावर अवैध वृक्षतोड करून माल घेऊन जाणाऱ्या ट्रकवर वन विभागाने कारवाई केली आहे. नियतक्षेत्र भोकरदनमध्ये गस्तीवर असताना मंगळवारी अवैध वृक्षतोड करून वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. यानंतर सदर ठिकाणी चौकशी केली तेव्हा वाहन (एमपी ०९ एचपी ७७७४) दिसून आले. या वाहनाची तपासणी केली असता अवैध वृक्षतोड करून वाहतूक होत अस–लेले गोल माल दिसून आला. दगडवाडी भोकरदन रोडवर अवैध वृक्षतोड करून वाहतूक करण्यात येत असलेले वाहन ताब्यात घेऊन जप्तीची संपुर्ण कार्यवाही करून आरोपी फिरोज खान मंजूर खान (वय ५३ वर्ष धंदा वाहन चालक रा.हमीदपुर ता.जि. बुराहनपुर राज्य मध्ये प्रदेश), अनस खान मुमताज खान (वय २६ वर्षे, वाहनमालक रा. बुऱ्हानपूर ता.जि. बुऱ्हानपूर) यांच्या विविध कलमाअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

# श्री समर्थ विद्यालयातील वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच भेट

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील पाटोदा माव येथिल श्री समर्थ माध्यमिक विद्यालयातील गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच परतुर येथिल सीटी हॉस्पिटल चे संचालक तथा प्रसिद्ध अस्थी रोग तज्ञ डॉ.सत्त्यानंद कराड यांनी दिले.




या बाबत सविस्तर वृत असे की,दर वर्षी प्रमाणे याही वर्षी जे विद्यार्थी गरीब आहेत तसेच होतकरू आहेत आर्थिक अडचणी मुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत अशी मुले शिक्षणा पासून वंचित राहतात अशांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक जाणीव ठेऊण गरजूंना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून आपण हा उपक्रम राबवित असल्याचे मत डॉ.कराड यांनी व्यक्त केले.

समाजात असे अनेक श्रीमंत व्यक्ती आहेत ते सहजपणे मदत करु शकतात त्यांनी पुढे येण्याची गरज आहे.ग्रामिण भागातील मुलेही हुशार आहेत त्यांना खरी मदतीची गरज असल्याचे डॉ.कराड यांनी सांगितले.

या वेळी त्यांनी शाळेचे सहशिक्षक पाराजी रोकडे , धनंजय जोशी ,चत्रभुज खवल यांच्या कडे पुस्तकांचे संच सुपूर्द केले.त्यांचा विद्यालयाच्या वतीने पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

या वेळी डॉ.संध्याताई कराड, प्रल्हाद कांबळे यांच्या सह दवाखान्यातील स्टाफ उपस्थित होता.

# मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील , स्व. राजेंद्रजी श्रीवास्तव महाविद्यालय इंग्लिश स्कूलमध्ये भव्य मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्व. हरी वंशराय बचन बहुउद्देशीय सेवाभावी ही संस्था पारध, लालबहादूर शास्त्री सांस्कृतिक व क्रीडा मंडळ आणि साधू , वास वाणी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्य शिबिर पार पडले .,या शिबिराचे उद्घाटन मा. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तथा मा.खासदार रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, जाफराबादचे नगराध्यक्षा सौ. सुरेखाताई लहाने ,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र देशमुख, संभाजीनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर जीवन राजपूत, डी.एस.आर तांदूळ जे, त्र्यंबक पाबळे, उबाठा शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख मा. नगराध्यक्ष भास्कर आंबेकर, पारध ग्रामपंचायत सरपंच सौ शारदाबाई काकफळे, जिल्हा परिषद चे मा. कृषी सभापती तथा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव ,उपसरपंच शेखर श्रीवास्तव, संस्थेचे सचिव विक्रांत श्रीवास्तव, यांची उपस्थित होती. आपल्या उद्घाटना वर भाषणात म्हणाले, की मनीष श्रीवास्तव , यांनी दिव्यांग अपंग बंधू भगिनी करिता कृत्रिम अवयव वाटप करण्याचा ,त्यांचा कार्याचा गौरव करीत म्हणाले. की राजकारण सोडा समाजकारण एकोपाने करा, अशी स्पष्ट भूमिका मांडत, सर्वपक्षीय



नेत्यांना पारध गावाच्या विकासासाठी एकत्रित येण्याचा मोलाचा सल्ला दिला, व केंद्रातील व राज्यातील युतीच्या सरकारने दिव्यांग ,अपंगाची काळजी घेणे .पण सरकारी योजना अजून गावापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही, त्याबद्दल खेद व्यक्त केली. तसेच आजच्या धावपळीच्या युगामध्ये पालक हे मुलांकडे लक्ष देत नाही. त्यांच्यावर चांगले संस्कार करणे ही पालकाची जबाबदारी आहे . येणाऱ्या काळात अत्यंत कठीण येणार असून, पालक हे मुलांना शाळेच्या गेट जवळ सोडून निघून जातात ,शाळेत जाऊन शिक्षकांनी आपल्या मुलाला काय शिकवले, मुलगा दररोज अभ्यास करतो का? ,वर्गात शिक्षकांना कधी विचारताना दिसतच नाही. तरी पालकांनी मुलावर जास्तीत जास्त त्यांच्या शिक्षणावर लक्ष देण्याची गरज आहे. वरील सर्व मान्यवर व्यक्तीच्या संस्थेच्या वतीने ,शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी, शिबिरात एकूण २६८ दिव्यांगाचा कृत्रिम हातपाय व अन्य अपंग गरजू गरीब लाभार्थींना डॉक्टर जीवनसिंग राजपूत, मिलिंद जाधव, डॉक्टर सलील जैन यांच्या मार्गदर्शन खाली मान्यवर व्यक्तीच्या शुभ हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला बुलढाणाचे माजी आमदार विजयराज शिंदे, पारध चे रहिवासी तथा संभाजीनगरचे उद्योजक शहेनशाहा भाऊ काटोले ,मंठ्याचे विधान परिषदेचे आमदार राजेश राठोड, यांनी या शिबिराला भेट देऊन, श्रीवास्तव कुटुंबियांचा शुभेच्छा च्या वर्षाव केला. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, परिश्रम केले,.

# आत्म्याशी परमात्म्याचे नाते जोडल्यास सर्व समस्यांचे समाधान– प्रो.गिरीश

## ब्रह्माकुमारीजच्या तीन दिवसीय 'आनंदी जीवन' शिबिराने दिली नवचैतन्याची प्रेरणा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जीवन आनंदमय करण्यासाठी मानसिक स्पष्टता, आत्मिक जागरूकता आणि सकारात्मक जीवनशैली अत्यावश्यक गरज आहे. ताण येत नाही, असा एकही व्यक्ती सापडून मिळणार नाही. तणाव मुक्तीसाठी आत्म्याशी परमात्म्याचे नाते जोडा. त्यामुळे सर्व समस्यांचे निराकरण होईल आणि तणावमुक्त जीवन जगणे सोपे बनेल, असे मौलिक आणि प्रभावी विचार प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते प्रो. ई. व्ही. गिरीश यांनी येथे बोलताना व्यक्त केले. ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या जालना येथील राजयोग भवन येथे १४ ते १६ जूनदरम्यान आयोजित आनंदी जीवन कसे जगावे? या तीन दिवसीय शिबिरात तणावाला सामोरे जाण्याची कला, आत्मविश्वासाने जगण्याचा मंत्र आणि राजयोग मेडिटेशनने आत्मिक परिवर्तन या तीन मुद्द्यांवर प्रो. गिरीश





यांनी केलेले मार्गदर्शन श्रोत्यांच्या मनाला भिडले. पहिल्या दिवशी तणाव – जीवनातील सर्वात मोठी अडचण या विषयावर बोलताना प्रो. गिरीश यांनी सांगितले की, तणाव हा बहुधा परिस्थितीमुळे नसतो, तर आपल्या प्रतिक्रियेमुळे निर्माण होतो. राजयोगाच्या सहाय्याने मनाला केंद्रित करणे आणि विचारांना शांतीच्या दिशेने वळवणे हे तणावमुक्त जीवनाचे रहस्य आहे. दुसऱ्या दिवशी स्वतःमधील नायकाला ओळखा या विषयावर त्यांनी आत्मचिंतनाच्या माध्यमातून श्रोत्यांना अंतर्मुख केले. प्रत्येकामध्ये एक विलक्षण क्षमता दडलेली असते, पण ती ओळखण्यासाठी आत्मबोध आणि स्वस्वरूपाशी प्रामाणिक संवाद आवश्यक आहे.आत्मशक्तीची ओळख आणि त्यातून निर्माण होणारा अंतःप्रकाश, हेच आनंदी जीवनाचे खरे सूत्र आहे, असे त्यांनी नमूद केले. तिसऱ्या आणि अंतिम दिवशी त्यांनी राजयोग मेडिटेशनच्या आधारे आत्मिक परिवर्तन या विषयावर अतिशय संवेदनशील मार्गदर्शन केले. राजयोग केवळ ध्यान नव्हे, तर तो आत्मा आणि परमात्म्यातील संबंधाची अनुभूती देणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्वात सहज परिवर्तन घडते, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रो. गिरीश यांनी त्यांच्या सहज, अनुभवसंपन्न शैलीत सायको–नेरोबिक्स, सकारात्मक संकल्पना आणि आत्मशक्ती जागृतीचे विवेचन करून उपस्थित श्रोत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. या तीन दिवसांच्या शिबिरात नागरिक, शिक्षक, व्यावसायिक, विद्यार्थी, गृहिणी अशा विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या प्रसंगी शिवरतन मुंदडा, श्याम शेलगावकर, ज्ञानदेव पायगव्हाणे, सुषमा पायगव्हाणे, दीपक बोधे, अंकुशराव राऊत, आर. आर. खडके, सुनिता सहानी, नारायण डागा , ज्योती सिंह, डॉ. शिल्पा मणियार, आशा चिलके, कविता नरवडे, भावना शाह, सीमा दाडे आदींसह व्यापारी, उद्योजक, डॉक्टर्स, मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष परिश्रम घेतले. शबिराच्या यशस्वीतेसाठी बऱ्हाणपूर झोनप्रमुख ब्रह्माकुमारी मंगला दीदी, शितल दीदी, सर्व केंद्रातील दीदी यांच्यासह कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना, डॉ. सतीश मोरे, मनोज जयस्वाल, अभय सहानी, भारती मोरे, छाया डागा, वीणा साबू आदींनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# खते-बियाणे, किटकनाशके निविष्ठा केंद्र तपासणीसाठी कृषि कार्यालयाचे भरारी पथक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ जून -**

जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५ लवकरच सुरु होत असुन, शेतकऱ्यांना उत्कृष्ट बियाणे, खते व किटकनाशके मिळण्यासाठी बाजारात उपलब्ध होणाऱ्या बियाणे, खते व किटकनाशक विक्रेते व उत्पादक यांच्या नियमित तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यासाठी नांदेड जिल्हयामध्ये जिल्हास्तरावर एक व प्रत्येक तालुकास्तरावर १६ असे एकुण १७ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना निविष्ठा खरेदी करतांना काही अडचणी येत असतील किंवा विक्रेत्यांकडून अडवणुक होत असेल तर तात्काळ संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

खरीप हंगामामध्ये कृषिसेवा केंद्रचालक किंवा खाजगी एजंटामार्फत शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे खते बियाणे व किटकनाशके शेतकऱ्यांना विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कृषि विभागाकडुन कृषि सेवा केंद्राची नियमित तपासणी करण्यात येत असते. सर्व निविष्ठांचे व्यवस्थित वाटप व चांगल्या प्रतीच्या निविष्ठा शेतकऱ्यांना मिळतील, शेतकऱ्यांची निविष्ठासाठी अडवणुक होणार नाही यासाठी भरारी पथक काम करणार आहे. त्याचबरोबर कृषि निविष्ठा विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री असे गैरप्रकार निदर्शनास आल्यास उत्पादक, विक्रेत्यांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्यात येतील. तसेच गैरव्यवहाराचे स्वरुप गंभीर असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा बोगस बियाणे, खते व किटकनाशकांची विक्री केल्यास संबंधिताविरुध्द भरारी पथकामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर भरारी पथकामध्ये तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी पंचायत समिती, निरीक्षक वजन व मापे व मंडळ कृषि अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हास्तरीय भरारी पथकात कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मोहिम अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, वजन मापे निरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे.

मागील वर्षात कृषि विभागामार्फत नांदेड जिल्हयात बोगस खते विक्री केल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अप्रमाणीत बियाण्यांची विक्री केल्यामुळे उत्पादक व कृषि सेवा केंद्रचालक यांच्या विरुध्द ३२ न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत. चालू खरीप हंगामामध्ये मोहीम राबवून रँडमली कृषि निविष्ठा विक्रेते व उत्पादकांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनियमितता आढळुन आल्यास संबंधितांचा परवाना निलंबित अथवा रद्द करण्यात येईल. त्यामुळे कोणत्याही निविष्ठा विक्रेत्यांनी गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री, बोगस खते बियाणे विक्री करु नये, असे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येणार आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# किनवट आगाराचे उत्पन्न वाढले, पण सेवा व व्यवस्थापनात घोळ कायम!

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१८ जून -**



उन्हाळी सुट्टी व लग्नसराईमुळे किनवट एसटी आगाराच्या उत्पन्नात १६.४२ लाख रुपयांची वाढ झाल्याची माहिती समोर आली असली, तरी ही वाढ प्रवाशांच्या विवशतेवर आधारित असल्याची टीका प्रवाशांमधून होत आहे. आगार प्रशासनाचे कौतुक करण्याऐवजी अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सध्या आगारात ४३ बसगाड्या असून, लवकरच आणखी १० नव्या बसगाड्या दाखल होणार असल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात जुन्या व मोडकळीस आलेल्या बसगाड्या वेळ-वेळी बंद पडतात. प्रवासादरम्यान प्रवाशांची गैरसोय होते. तरीही प्रवाशांना दुसरा पर्याय नसल्याने त्यांना बसनेच प्रवास करावा लागतो. परिणामी, ही उत्पन्नवाढ ही सेवा सुधारण्यामुळे नाही तर प्रवाशांच्या विवशतेमुळे झाली आहे, असा आरोप प्रवासी करत आहेत. बस स्थानकातील अस्वच्छता, बसचे अवेळी सुटणे, बसस्थानक आवारातील बेसुमार वृक्षतोड, तसेच काही वाहक व चालकांचा आडमुठेपणा यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. जिल्हा ठिकाणी जाण्यासाठी आवश्यक बसेस उपलब्ध नसल्याची तक्रार वारंवार ऐकू येते. चालक व वाहकांची सर्व पदे न भरल्याने व्यवस्थापन अर्धवट व अकार्यक्षम असल्याचे स्पष्ट होते.

आगारप्रमुख वाय.एच. खिल्लारे यांनी उत्पन्नवाढीचा उल्लेख केला असला, तरी अनेक प्रवाशांचे म्हणणे आहे की हे उत्पन्न हे आगार प्रशासनाच्या परिश्रमामुळे नाही, तर किनवटच्या भौगोलिक व प्रवासी विवशतेमुळे नैसर्गिकरीत्या मिळाले आहे. शिवाय, नुकतीच झालेली भाडेवाढही उत्पन्नवाढीचे एक कारण असल्याचे स्पष्ट होत आहे.

येत्या आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेसाठी २ ते १३ जुलैदरम्यान १० बसगाड्यांचे नियोजन करण्यात आले असले, तरी त्या सेवा वेळेवर व सुरळीत चालतील की नाही, याबाबत प्रवाशांमध्ये साशंकता आहे. कारण, मागील अनुभव पाहता नियोजन फक्त कागदावरच राहते, ही टीका अनेक वारकरी करत आहेत.

एकूणच, उत्पन्नवाढीमागे सेवा सुधारणा नाही तर प्रवाशांची पर्यायशून्यता हेच खरे कारण असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आगार प्रशासनाने आत्मप्रौढी टाळून सेवा गुणवत्तेकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मठाधिपती एकनाथ नामदेव महाराज यांच्या अभीष्टचिंतन सोहळा निमित्ताने फळ वाटप

**कंधार** -प्रति पंढरपूर म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र उमरज संस्थान चे मठाधिपती महंत श्री गुरूवर्य एकनाथ नामदेव महाराज उमरजकर यांच्या अभीष्टचिंतन सोहोळ्याच्या निमित्ताने आज दिनांक १६ जून २०२२ रोज गुरूवार या दिवशी श्री नवनाथ पाटील तोरणे यांच्या नेतृत्वाखाली कंधार येथील रुग्णालयात फळ वाटप करण्यात आले.यावेळी डॉ.सगर स्नेहल (नेत्ररोग तज्ञ),ग्रामीण रुग्णालय,कंधार, डॉ.निखत फातेमा वैद्यकीय अधिकारी, सिद्धेश्वर सूर्यवंशी नेत्र चिकित्सा अधिकारी, दिलीप केंद्रे (कनिष्ठ लिपीक), शंकर चिवडे (औषध निर्माण अधिकारी), यांच्या प्रमुख उपस्थितीत फळे वाटप करण्यात आले यावेळी नवनाथ पाटील तोरणे, उंब्रज पोलीस पाटील राजू पाटील भुते, फौजी कृष्णा पाटील भुते, परशुराम केंद्रे ,विठ्ठल पाटील भुते, शंकर पाटील भुते, ज्ञानेश्वर माऊली तोरणे, विष्णू केंद्रे, गणपत जाधव, राजेश्वर नागरगोजे व ईतर शिष्य मंडळी उपस्थित होती.

### बितनाळ जि.प. शाळेत पहिल्याच दिवशी पाठयपुस्तक अरोग्य तपासणी



**उमरी** -उमरी तालुक्यात शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात तालुक्यात अग्रेसर असलेल्या मौजे बितनाळ येथिल जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थाना पाठयपुस्तक अरोग्य तपासणी , स्वादिस्ट खाऊ देवून विद्यार्थीचे जंगी स्वागत करण्यात आले आहे. दिनांक १६ जून २०२५ रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सवानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांची गावात प्रभात फेरी गावातून काढण्यात आली आणि स्वच्छतेचा नारा , एक झाड माँ के नाम , असे विविध उपक्रमाचे नारे देत सामाजिक जनजागृती करून मुले जिल्हा परिषद शाळेचा टाकून शाळेचा दर्जा उचांवण्यावर भर देण्यात आले आहे यावेळी उपस्थित शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले ; प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा शाळेमध्ये प्रवेश करण्यात आला उपस्थित सर्व वर्ग पहिलीच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शाळेचा पहिलाच दिवस सर्व विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करण्यात आला. याप्रसंगी उमरी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी शंकर बेळकोने तसेच बितनाळ केंद्राचे केंद्रप्रमुख चाटोरीकर उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागनाथ घुमलवाड,उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी , सरपंच प्र मारोतराव उमाटे , उपसरपंच प्र देविदासराव अक्कमवाड , तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार, शेख सर, लक्ष्मण वडमिले, कळस्कर सर, मोटारवार सर, घोगरे सर, शिवणखेडकर सर, पेंडलवार सर, सौ तांबरे मॅडम, सौ. कल्याणकर मॅडम उपस्थित होते.

### डिजिटल मिडिया परिषदेच्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदी शेख मुजीब यांची निवड

**नांदेड**-अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी आयबीएन लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी शेख मुजीब यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशाने डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी ही निवड जाहीर केली आहे. या जिल्हाध्यक्ष पदाचा कार्यकाळ हा दोन वर्षांसाठी राहील. शेख मुजीब यांच्या या निवडीबद्दल राज्य उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, लातूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष विजय जोशी, माजी सरचिटणीस चारुदत्त चौधरी, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, माजी जिल्हाध्यक्ष गोवर्धन बियाणी, कार्याध्यक्ष अनिल कसबे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक प्रदीप नागापूरकर, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस अनुराग पोवळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक रवी संगनवार आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# तामस्यात ८ वर्षीय मुलीशी अश्लील वर्तन, पोस्को व अट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दखल

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.१८ जून -**

हदगाव तालुक्यातील तामसा शहरात माणुसकीला काळीमा फासणारी घटना पुन्हा घडली असून एका ६० वर्षीय इसमाने ८ वर्षीय मुलगी घरासमोर खेळत असतांना वाईट हेतूने तिचेशी अश्लील वर्तन केल्याची दुर्दैवी घटना १५ रोजी सायंकाळी ७ वाजताचे दरम्यान घडली. पिडीत मुलीच्या आईने दि. १६ रोजी सोमवारी दिलेल्या तक्रारीवरुन तामसा पोलिसांनी सायंकाळी पोस्को व ॲट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करुन आरोपीला बेड्या ठोकल्या. तामसा भागात वारंवार घडणाऱ्या संतापजनक घटनेमुळे तामसा शहराच्या बदनामीने चांगलीच खळबळ उडाली आहे.

तामसा येथील ६० वर्षीय बळीराम मारोती हरण याने एका मजुराच्या ८ वर्षीय मुलीसोबत अश्लील वर्तन करुन माणुसकीच्या तोंडाला काळे फासले आहे. पिडीत मुलगी रविवारी सायंकाळी घरासमोरच्या मोकळ्या जागेत खेळत असताना तिला वाईट उद्देशाने पकडून तिचेशी अश्लील गैरवर्तन केले. गुप्त अंग दाखवत निर्लज्जपणे अश्लील वर्तन करण्याचा अत्यंत संतापजनक प्रकार केला. चिमुकलीने घडलेला सगळा प्रकार तिचे आईला सांगितला. आईने नवरा व दिराला सांगितले. पीडित चिमुकलीच्या संतप्त आईच्या तक्रारीवरुन तामसा पोलिसांनी नराधम बळीराम हरण विरुद्ध सोमवारी पोस्को व ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करुन आरोपी बळीराम हरण याला अटक केली. सहायक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून मुलीच्या आईचा जबाब व्हिडिओ रेकॉर्डर करून गुन्हा दखल केला. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी धर्माबाद इन्चार्ज भोकर प्रशांत संपते करीत आहेत.

**तामसा पोलीस ठाण्यात पाच महिन्यात पोस्कोसह अॅट्रॉसिटीचे सहा गुन्हे**

तामसा पोलीस ठाण्यात पाच महिन्यात पोस्कोसह अट्रॉसिटीचे किमान पाच ते सहा गुन्हे दाखल होणे, अत्यंत गंभीर बाब आहे. यावरून येथील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आहे. अवैध धंदे, चोऱ्या, हाणामाऱ्या, पोस्को, ॲट्रॉसिटी या घटना नेहमीच्याच झाल्याने तामसा पोलिसांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तामसा शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे तामस्याचा 'तमाशा' होण्याची वेळ आली असून यावर अंकुश मिळवणाऱ्या एका सक्षम अधिकाऱ्यांची तामसा पोलीस ठाण्याला गरज असल्याची मागणी होत आहे.

# पक्षाने संधी दिल्यास वडेपुरी सर्कल मधून जि.प. निवडणूक लढविणार: विलास गजभारे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१८ जून -**

निवडणूक आयोगाकडून निवडणुकीस प्रदीर्घ झालेल्या विलंबामुळे आता निवडणुकीची तयारी आयोगामार्फत जलद गतीने चालू आहे. यामुळे जिल्हा परिषद सदस्यांची चुरस वाढली आहे. त्यापैकीच ढाकणी येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष विलास गजभारे हे पक्षाने संधी दिल्यास जिल्हा परिषद सर्कल वडेपुरी ता. लोहा या ठिकाणाहून निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भातील प्रशासनाने प्रभाग रचना करण्याचे आदेश जारी केले आहेत. गेल्या तीन ते साडेतीन वर्षापासून निवडणुका झाल्या नसल्याने प्रशासकाद्वारे कारभार चालत आहे. तेव्हा इच्छुक उमेदवार मोठ्या उत्साहाने व मोठ्या नियोजनात्मक पद्धतीने निवडणूक लढवण्यास बेसबरीने प्रतीक्षेत आहेत अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाल्यास आपण जिल्हा परिषद वडेपुरी सर्कल मधून निवडणूक लढवण्याचा ठाम निर्णय घेतला असल्याची माहिती विलास गजभारे यांनी दिली. त्या अनुषंगाने आपण वडेपुरी सर्कल येथील मतदारांशी भेटीगाठी व संपर्क साधण्याचे काम आतून चालू आहे असेही ते म्हणाले. गेल्या ३० वर्षापासून आपण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे काम एकनिष्ठेने करीत आलो आहे. माझे मार्गदर्शक राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांच्या खांद्याला खांदा लावून आज पर्यंत काम करत आलो आहे. यामुळे मला विश्वास आहे की पक्ष माझ्यावर अन्याय करणार नाही गोरगरिबांच्या हितासाठी आपण अहोरात्र प्रयत्न केले असुन पक्षाचे शहर जिल्हा अध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांनीही निवडणुकीस संधी मिळवून देण्याचा विश्वास दर्शविला आहे.

# मुदखेड शहरात तीन वेगवेगळे अपघात

## एका मेंढपाळ युवकाचा जागीच मृत्यू ; चार जखमी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१८ जून -**

मुदखेड शहरामध्ये तीन वेगवेगळे अपघात झाले असून यात एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी आठच्या सुमारास घडली आहे तर तिघांना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले.

मुदखेड शहरातील रहिवाशी बालाजी नारायण संबोड वय २४ वर्ष हा दुचाकी वर मेंढेपाळाला सोडून घराकडे जेवण्याचा डबा घेण्यासाठी येत असताना पांढरवाडी होऊन मुदखेडकडे येणाऱ्या आनंदा धोंडीबा कौसल्य वय ३५ व मुलगा अनिरुद्ध आनंदराव कौशल्य पाढरवाडी वरून मुदखेडला येत असताना सरदार वल्लभाई पटेल शाळेच्या पाठीमागे मुख्य पाढरवाडी ते मुदखेड रोडवर दोन मोटरसायकल चा आमने सामने अपघात झाला यामध्ये बालाजी नारायण संबोड हा युवक जागीच ठार झाला आहे तर आनंदा धोंडीबा कौशल्य व त्यांचा मुलगा अनिरुद्ध आनंदा कौशल्य हे गंभीर जखमी झाले असून या दोघांना मुदखेड ग्रामीण रुग्णालयातून उपचार करून नांदेड येथे हलविण्यात आले आहे. ही घटना रात्री आठ साडेआठच्या सुमारास घडली आहे.



दुसरा अपघात मुदखेड चिकाळा रोडवर मोटरसायकलचा अपघात होऊन अविनाश यादवराव कळसे वय ३० रा. मांजरम तालुका नायगाव, हे पाढरवाडी वरून माजरमकडे जात असताना अपघात झाला यात तो गंभीर जखमी झाला असून त्याला मुदखेड ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले.

तिसरा अपघात शहरातील बाळासाहेब ठाकरे चौकात महेश राजू गोदमगावे. मोटर सायकलवरून स्लीप होऊन खाली पडल्यामुळे त्याच्या तोंडाला मोठा दुखापत झाला असुन त्याला मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.

शहरात रात्री आठ साडेआठच्या सुमारास वेगवेगळ्या ठिकाणी तीन अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत यामध्ये शहरातील मेंढीपाळ युवक जेवण्याचा डब्बा आणण्यासाठी घरी येत असताना त्याच्यावर काळाने घाव घातल्यामुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, उप पोलीस निरीक्षक बी.आर.कांबळे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी या जखमींना १०८ रुग्णवाहिकाचे चालक साईनाथ गिरी यांनी जखमींना मुदखेड ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे डॉक्टर शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

# मुदखेड पंचायत समिती कार्यालय येथे गटविकास अधिकारी नव्याने रुजू



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१८ जून -**

मुदखेड पंचायत समिती कार्यालय येथे नव्यांने रजू झालेले गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांचा प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तसेच प्रहार संघटनेचे पदाधिकारी यांनी योजने बद्दल व ग्रामपंचायत ५% निधी बद्दल अनेक योजने विषयी चर्चा करण्यात आली. यावेळी माजी प्रहार तालुकाध्यक्ष अनिल पाटील शेटे,महिला अध्यक्षा सौ. केशरताई शिंदे पा,शंकर पाटील शिंदे, साहेबराव निवडंगे,अरुणा बाई शेवडीकर,यासह अनेक प्रहार संघटनेचे कार्यकर्ते व महिला आघाडी उपस्थित होते.

# ग्लँडर्स संसर्गजण्य रोगापासून गाढव व घोड्याची काळजी घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि.१८ जून -**

नुकतेच नांदेडमध्ये ग्लँडर्स चा प्रादुर्भाव झालेले अश्व आढळल्याने जिल्हाधिकारी यांनी प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजना करण्याचे आदेश काढले आहेत. या संसर्गजण्य रोगाची तीव्रता लक्षात घेता प्रादुर्भाव रोखणे गरजेचे असल्याने सगरोळी (ता.बिलोली) येथील धर्मा डाँकी सँचुअरीने या रोगाची माहिती, त्याची कारणे, लक्षणे व उपाय योजना करून काळजी घेण्याचे आवाहन पशु पालकांना केले आहे. गाढव पालकांच्या बैठका घेऊन त्यांना माहिती देखील दिली जाणार असल्याचे सांगितले.

ग्लँडर्स (Glanders) किंवा फार्सी हा गाढवांमध्ये आढळणारा एक अत्यंत गंभीर व संसर्गजन्य रोग आहे, जो बुर्खोल्डेरिया मल्लेई (Burkholderia mallei) या जीवाणूमुळे होतो. हा रोग मुख्यतः श्वसनमार्ग, त्वचा व रक्तप्रवाहातून पसरतो आणि तो माणसांमध्येही होऊ शकतो, त्यामुळे अत्यंत काळजीपूर्वक हाताळावा लागतो.

संसर्ग झालेल्या प्राण्यांशी संपर्क, संक्रमित अन्नपाणी, श्वसनाद्वारे बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतो. रोगग्रस्त प्राण्याचा पू, नाकातील स्त्राव, संक्रमित फोड फुटून झालेल्या जखमा यांच्याशी संपर्क हा मुख्य संसर्गाचा मार्ग असतो.



गाढवांमध्ये लक्षणे तीव्र स्वरुपाची असतात. त्यांच्या यामुळे आकस्मिक मृत्यू होतो. परंतु घोड्यामध्ये नाकातून पूयुक्त स्त्राव, घशात गाठी, त्वचेवर गाठी, ताप, खोकला, श्वास घेण्यात अडचण, अशक्तपणा व मरगळ दिसते.

ग्लँडर्सवर कोणताही खात्रीशीर उपचार उपलब्ध नाही. त्यामुळे संशयित प्राणी तात्काळ विलग करावा. रोगाची खात्री झाल्यास शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राण्याला संक्रामक म्हणून वेदनामुक्त वध करणे आवश्यक असते. यासाठी CFT (Complement Fixation Test) तपासणी केली जाते.

गोठा स्वच्छ व निर्जंतुक ठेवावा, नवीन प्राणी घेताना तपासणी करूनच गोठ्यात सामावून घ्यावा. शक्यतो बाधित क्षेत्रातून खरेदी/ प्रवास करणे टाळावे, संसर्ग झाल्यास इतर प्राण्यांपासून पूर्णपणे वेगळे ठेवावे. पशुवैद्यकीय दवाखान्यात सूचना देणे व त्यांच्या सल्ल्याशिवाय कोणताही उपचार करू नये. शासनाच्या सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक. ग्लँडर्स ही अत्यंत धोकादायक व सार्वजनिक आरोग्यासाठी घातक असलेली साथ आहे, त्यामुळे सतर्कता आणि योग्य प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे. गाढव पालकांनी आपल्या गाढवांची काळजी घ्यावी असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# माहूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याची नगराध्यक्षांची आरोग्य मंत्र्याकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.१८ जून -**

माहूर तीर्थक्षेत्रावरील ट्रॉमा केअर सेंटरची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे.या मागणीच्या अनुषंगाने उपसंचालक, लातूर यांनी ट्रॉमा केअर सेंटर ऐवजी ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय प्रस्तावित केले होते, परंतु हा प्रस्ताव देखील मंजुरीसाठी मंत्रालयात धुळखात पडला आहे. मात्र तीर्थक्षेत्र माहूर येथील तरंगती लोकसंख्या लक्षात घेऊन सर्वसुविधायुक्त असे १०० खाटांचे शासकीय उपजिल्हा रुग्णालय मंजूर करून त्या अनुषंगाने गंभीर रुग्णांना मिळणाऱ्या सर्व



सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व माहूर शहरातील अत्यंत जुने व जीर्ण अवस्थेत असलेले विद्युत वाहक तार बदलून त्याऐवजी बंदिस्त केबल बसवा, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दि.१६ रोजी माहूर दौऱ्यावर आलेल्या राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्य मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे दोन स्वतंत्र निवेदनाद्वारे केली आहे.

माहूर हे जग प्रसिध्द तिर्थ क्षेत्र असून, एकट्या माहूर शहराची लोकसंख्या जवळपास २५ हजाराच्या घरात तर तालुक्यातील ९२ गावातील २ लक्ष नागरीक यासह दररोज देवदर्शनासाठी येणारे हजारों भाविक या सर्वांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी माहूर येथे एकमेव ग्रामीण रुग्णालय उपलब्ध आहे. दैनंदिन आवागमन करणा-या भाविकांच्या आरोग्य सुविधेसाठी व या तालुक्यातील गोरगरिब, दिन-दलित,आदिवासी, बहुजन नागरीकांच्या आरोग्य सेवेसाठी माहूर येथे एकमेव शासकीय ग्रामीण रुग्णालय उपलब्ध असल्याने या ठिकाणी खाजगी तत्वावर असलेले डायलिसिस सेंटर शासना मार्फत कायम स्वरुपी उपलब्ध करुन सर्व सुविधेसह १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात यावे !, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी देवदर्शनानिमित्ताने माहूर दौऱ्यावर आलेल्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्य मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

